ज्येष्ठ शके १८२४.

घटकाभर करमणूक

१८.

लेखक,

हरि नारायण आपटे.

निवळ मासला.

विषय

बाबाजी सखाराम आणि कं.

मुंबई.

“चुकलें क्षमा करा”—पृष्ठ २२.



खंडाळ्याच्या घाटांत.

शहरांत राहणारे आपण, आपल्या कामधंद्याच्या थोडाबहुत आड येण्या इतका पाऊस पडला, कीं लागलेंच त्या बिचाऱ्याला किती शिव्याशाप देऊं लागतों! त्या बिचाऱ्याच्या हातून जीवसृष्टीला, व जडसृष्टीला किती फायदा होतो ही गोष्ट त्यावेळीं आपल्या स्मरणा पासून किती तरी दूर असते! परंतु त्याच पावसानें वनास व पर्वतांस आणलेली अत्यंत उदात्त, रमणीय व धीर गंभीर शोभा दृष्टीस पडली, ह्मणजे त्यानें आपली चित्तवृति किती विलक्षण होते! सर्व जीवसृष्टीचा व जडसृष्टीचा आधार जल व तेज. परंतु या जलाची व तेजाची खरी योग्यता काय, हें कूपमंडूकाप्रमाणें केवळ शहरांतच आपलें आयुष्य घालविणाऱ्या आपस्वार्थी आपणांस, खऱ्यातऱ्हेनें कधींही समजण्याचा संभव नसतो. ती समजण्याला एकवेळां तरी या दिवसांत वनश्री आणि पर्वतश्री पहाण्याची संधि आणावी. आपल्या या पुणें प्रांतीं खंडाळ्याच्या घाटांत ही वनाची व पर्वताची शोभा जितक्या उदात्त रूपानें दृष्टीस पडते तितकी इतरत्र फारच क्वचित् दृष्टीस पडत असेल.

खंडाळ्याचें स्टेशन सोडून, आतां आपल्याला भव्य अशा वनश्रीमधून जायला सांपडणार, ह्मणून अत्यंत आनंदित होऊनच कीं काय अग्निरथ उड्या मारीत जाऊं लागतो व त्याच्या बरोबर आपला अंतरात्माही भात्री दृष्टिसुखानें उचंबळूं लागतो. पुणें सोडल्यापासून बराच वेळ लोणावळें सोडीपर्यंत ह्मटलें तरी चालेल—मी एक मजेचें पुस्तकच वाचीत होतों. तोंपर्यंत दुतर्फा पाणी व हिरवीं चार शेतें यांखेरीज कांहींच दिसलें नाहीं; परंतु लोणावळें सोडल्यानंतर "आतां कायती खरी वनश्री व पर्वतश्री दिसणार!" असें मनांत येऊन पुस्तक आपोआप हाता-वेगळें झालें आणि दृष्टि चंचळ झाली. त्या भव्य देखाव्याच्या प्रत्यक्ष दर्शनाचें सुख घेण्यासाठीं, अंतर्बाह्य नेत्रांनीं पूर्णपणें तयारी केली. इतक्यांत पहिल्या बोगद्यांत शिरण्यापूर्वीं आह्मांस जणूं काय इशारत ह्मणून, आमच्या अग्निरथानें मोठ्यानें कंठघोश केला. तो ऐकून मला तर असें वाटलें कीं, जणूं काय त्या बिचाऱ्यास अंधकारांत शिरण्याचें फार भयच वाटत आहे. परंतु कोणचेंही सुख घेण्यापूर्वीं थोडेंबुहुत दुःख भोगणें, हें पुढील सुखाच्या उपभोगास फार उपयोगी असतें. थंड गार पाण्यानें खरा आनंद होण्यास पूर्वीं तहानेनें कंठशोष झालेला असला तरच मौज. वृक्षाच्या शीतल छायेचें सुख भोगण्यास पूर्वीं उन्हातान्हांतून हिंडल्यामुळें घामाच्या धारा चालल्या असल्या तरच उपयोग. बोगद्यांत शिरल्याबरोबर आंतल्या

अंधारानें, धुरानें व एकंदर कोंडमाऱ्यानें थोडेंबहुत त्रास-
त्यानंतर, बाहेर पडतांच एकदम आमच्या उजव्या बाजूला
पर्वतकंदरांची शोभा दिसली, ती किती भव्य! ती पाह-
तांच डोळे एकदम चकित होऊन स्थिरावले. वर ढगांनीं
अगदीं व्याप्त झालेल्या शिखरांपासून तों तहत खालीं सपा-
टीपर्यंत पैशाएवढी जागासुद्धां वनस्पतिविरहित दिसेना.
जिकडे पहावें तिकडे हिरवें चार. त्यांत आणखी डोंगरां-
वरून ठिकठिकाणीं एकसारखे फेसमय, दुधाप्रमाणें अत्यंत
पांढरे असे दिसणारे पाण्याचे लोट वरच्या दरडीवरून
खालच्या, खालचीवरून तिच्या खालच्या, अशा तऱ्हेनें
अत्यंत वेगानें पडत होते. ती तर नुसती बहारच दिसत
होती. एके ठिकाणीं तर पाण्याचा लोट इतक्या
जोरानें खालच्या एका विस्तीर्ण खडकावर पडत होता कीं,
त्यावर तो येऊन आदळतांच त्याचे अणुपरमाणु भिन्न
भिन्न होऊन, पुनः त्यांचे मेघ बनून वर चालले आहेत असें
वाटल्याखेरीज राहतच नसे. मी कितीवेळ तरी त्या एकाच
लोंढ्याकडे पहात होतों. त्याच्या पडण्याच्या जागेपासून पुढें
तो तसाच चाललेला जर दिसताना, तर मला असेंच वाटलें
असतें कीं, केवळ इतक्या उंचावरून पडल्यामुळें होणाऱ्या
जबरदस्त आघाताच्या उष्णतेनें त्या लोंढ्याची पुनः वाफ
होऊन, तो मेघरूपानें पुन आकाशांत जातो आहे. त्या
तेवढ्या त्या ओघाच्या स्थानांत खालवर सर्व प्रांत अगदीं
मेघांनींच पूर्णपणें व्यापल्याप्रमाणें दिसत होता. परंतु जेथें

तो ओघ पडत होता, तेथून सुमारें पांच सात हातांवर तोच ओघ नागमोडीप्रमाणें वहात चालला होता, तिकडे दृष्टि गेली ह्मणजे ती एक शोभा कांहीं निराळीच दिसे. सुमारें पन्नास हातांवर त्याचा तो दुधाच्या फेंसासारखा पांढरा रंग कोणीकडच्या कोणीकडे गेल्याप्रमाणें झालें. त्याच्या अंगीं लालीची झांक दिसूं लागली, आणि खालच्या दरींत जाऊन सपाटीच्या भागावर गेल्यावर तर तो चांगलाच लाल दिसूं लागला. जणूं काय त्याच्या मनांत नसलेली गोष्ट करावी लागली, ह्मणून त्याला अत्यंत संतापच आला होता. त्या संतापानें संतप्त होऊनच तो पुढें चालला होता. त्यास आपण कोठें जातों वगैरे कांहीं धडपणें दिसत नसून केवळ पुढें जायचें, मग वाटेंत काय अडचणी येतील, काय संकटें येतील, आपल्या उद्धत गतीनें कोणाचें काय नुकसान होईल, याचा विचार त्याच्या स्वप्नांत सुद्धां येत नव्हतासें दिसलें. 'पुढें! पुढें!' हाच कायतो त्याचा सततचा जप दिसला. यावेळीं झिमझिम पाऊस पडत असल्या कारणानें कोठेंही पक्षी ह्मणून दिसत नव्हते. बिचारे सारे कुठें तरी वृक्षच्छायेला बसून वेळ काढीत असावे. मुख्यतः जी काय शोभा दिसत होती, ती हिरव्या रंगाची. आकाशाकडे पाहिलें असतां काळसर व पांढुरके असे ढग आणि दुसऱ्या कोणीकडे पाहिलें तर हिरवें हिरवें चार किंवा त्याच हिरव्या रंगाच्या कमीअधिक मानाच्या छाया. मोह, चार, वड, साय हे वृक्ष नुसते पर्णमय झालेले आणि

त्यांच्या भिन्नभिन्न शाखांतील अंतर सुद्धां दिसूं नये ह्मणूनच काय, त्यांपैकीं कित्येकांवर कांहीं रानवेली पसरून त्यांनीं त्यांचे सर्व देह गुरफटून टाकलेले होते. रानझाडांवर कांहीं बारीक फुलांखेरीज आणि कांहीं मोठ्या झाडांवरही दिसणाऱ्या फुलोऱ्याखेरीज, फुलांचें दर्शनही होत नव्हतें. सगळी बहार कायती पानांची ! हीं पानें एकसारखीं पावसानें भिजून आपल्या अंगावरील बिंदु खालच्या पानांवर व खालचीं पानें आपल्या खालच्या पानांवर याप्रमाणें फेंकून देत होतीं. आणि शेवटीं सपाटीच्या जवळ उगवलेल्या गवतास मात्र त्या सगळ्या पाण्याचा मार खावा लागत होता. काय करील गरीब बिचारें! मुकाट्यानें आपलें डोकें खालीं लववून—अगदीं भुईला लावून, अश्रु गाळीत होते असें दिसे. अग्निरथाचा वेग आह्मांला एकच शोभा एकसारखी थोडीच पाहूं देत होता! पुनः पुनः बोगद्यांत शिरून, त्या भव्योदार शोभेस आमच्या दृष्टी आड करी, पुनः त्या शोभेचें दर्शन देई. सुमारें पांचसहा बोगदे गेल्यानंतर मीं खालीं दूरवर पाहिलें, तों मघाशीं सांगितलेला तो डोंगरावरून पडून सपाटीला लागलेला जलाचा ओघ आतां फारच प्रचंड दिसूं लागून एखाद्या राक्षसी अजगराप्रमाणें लांबवर पसरत चाललेला दिसला. आजूबाजूच्या डोंगरांवरून धडधडत येणारे आणखी कित्येक जलौघ त्याला येऊन मिळालेले दिसत होते. ज्याप्रमाणें एखादा मूळचा दरिद्री, परंतु एकाएकीं द्रव्यवान्

झालेला पुरुष, त्याला अधिकाधिक द्रव्य मिळत चाललें ह्मणजे केवळ उन्मत्त-मदांध-होतो, त्याप्रमाणें त्या जलौघाची स्थिति झालेली दिसत होती. आपल्या स्वैरगतीमुळें कोणाचें काय नुकसान होईल, कोणाला किती दुःख सोसावें लागेल, याचा त्यास आणुमात्र विचार दिसला नाहीं. जें त्याच्या तावडींत सांपडेल, तें त्यानें होतां होईल तों आपल्या पुढें लाथाडीत नेलेंच ह्मणून समजावें. मद्यपानानें धुंद झालेल्याच्या नेत्रांप्रमाणें तो तांबडा लाल दिसत होता. इतकी जलसंपत्ति नव्हती, तेव्हांचा त्याचा तो दुधाच्या फेंसासारखा शुद्धपणा, आतां कोणीकडच्या कोणीकडेच गेलासा दिसला. गरीबींतला शुद्धपणा त्याला टक्केटोणपे खाऊन मिळाला होता. बिचाऱ्याला असें समजेना कीं, आपल्या या उद्धटपणामुळेंच आपल्यास आकाश सोडावें लागलें. आकाश सोडल्याबरोबर पहिला दणका बसला, तो डोंगराच्या शिखरावर. बरें तें तरी उच्चस्थान नीटपणें राखावें? पण छे! तेथून जणूं काय जीव घेऊनच पळत सुटला, तो तडातड आणखी टक्केटोणपे खात त्यानें चांगला शुद्धपणा प्राप्त करून घेतला. पण त्याची आठवण रहाते कोठली? थोडेंसें ऐश्वर्य येऊन तें चार दिशांनीं इतरांच्या सहाय्यानें वाढतांच पूर्वीच्या त्या शुद्धपणाची सर्व विस्मृति झाली. आणि मी त्यावेळीं पहात होतों, ती स्थिति त्यानें धारण केली. त्या उद्धटानें किती शेतांचें, किती खेड्यांचें नुकसान केलें असेल याचा कांहींच नेम नाहीं. किती

गरीब लोकांना आपलीं घरेंदारें टाकून पळविण्याला लाविलें असेल! किती गरीबांचा बळीही घेतला असेल! द्रव्यैश्वर्यमदानें अंध झालेल्या नरपशूचें आणि त्या औटघटकेचें राज्य इतक्या उद्दामपणानें—क्रूरपणानें उपभोगणाऱ्या ओढ्याचें किती तरी साम्य आहे! तो सर्व चमत्कार पाहून माझें चित्त उद्विग्न झालें व मी आपल्या मनांत एकदम त्या ओढयाला संबोधून ह्मटलें, "अरे ओढ्या, या तुझ्या औटघटकेच्या दिमाखाची तुला लाज कशी वाटत नाहीं? महिन्यापूर्वी कुठें होतास! आणखी चार सहा महिन्यांनीं कुठें जाशील, याचा कांहीं विचार कर!" परंतु माझा तो बोध त्याला काय उपयोगी? इतर द्रविण मदांधांप्रमाणें त्याचेही कान बधिरच झालेले. मी ह्मणत होतों त्याचा पक्का खरेपणा माझा मलाच भासावा ह्मणूनच काय, याच वेळीं आमची आगगाडी एका बोगद्यापाशीं आली व तेथें त्या बोगद्याच्या तोंडाशीं पावसानें चिंब भिजून कुडकुडत उभा राहून आपल्या क्षीण हातांनीं हलकेच निशाण दाखविणारा एक माणूस नजरेस पडला. मी त्याच्याकडे पाहिलें आणि एकदम माझ्या तोंडांतून एक लांबसा उसासा निघाला. हा मनुष्य कां बरें अशा स्थितींत उभा आहे? काय याला पावसाची भीति वाटत नाहीं? थंडीवाऱ्यापासून याला दुःख होत नाहीं? एक वेळां त्याच्या तोंडाकडे पाहिलें पुरे, कीं या सर्वांपासून तो अलिप्त नाहीं, त्याला हीं सर्व जाचतात, परंतु एका वितीच्या कधींही न भरणाऱ्या खळग्यांत

रोजरोज कांहीं तरी घालायला पाहिजे, आणि तें द्रव्यवान् लोकांच्या सुखासाठीं असले भयंकर ताप सोसल्याखेरीज आपल्याला मिळायचें नाहीं, ही पक्की खात्री असल्यामुळेंच तो बिचारा कुडकुडत तडफडत तेथें उभा आहे. मनांत मात्र खास शिव्या देत असेल. इतका विचार माझ्या मनांत येऊन जातो न जातो, तोंच आमची गाडी बोगद्याच्या दुसऱ्या तोंडांतून बाहेर पडली आणि थोड्या अंतरावर माझ्या दृष्टीस एक लहानसें झोंपडें फारच लहान दिसलें. त्या झोंपड्यांत, तेथल्या तेथेंच तयार केलेल्या दोन ओबडधोबड खाटा टाकलेल्या दिसल्या. एका खाटेवर एक स्त्री व तिच्या मांडीवर दोन वर्षांचें बालक. तें बालक अगदीं उघडें होतें, परंतु आपल्या आईच्या मांडीची ऊब मिळाल्याकारणानें सुखांत असून आमच्या झपाट्यानें चालणाऱ्या गाडीकडे पाहून हंसत होतें, आणि त्या हंसण्यानें ती त्याची आईही हंसत होतीसें दिसलें. हा देखावा पाहून माझ्या मनाची काय बरें स्थिति झाली असेल? क्षणार्धापूर्वीं ज्यांना मी अत्यंत दुःखी ह्मणून समजत होतों, त्यांनाही मनापासून हंसतानापाहून "एकूण याही स्थितींत समाधान मानून या माणसांस खऱ्या सुखाचा अनुभव मिळतो अं?" असें मनांत आलें आणि बरें वाटलें. त्यावरून पुढें सुखदुःखांचा परस्परसंबंध काय बरें असावा? हा विचार मनांत येऊन डोकें त्या तंद्रीस लागण्याच्या बेतांत आलें. परंतु दूरवर दिसणारें तें सृष्टिसौंदर्य

इतकें भव्य, मोहक व चित्ताकर्षक होतें कीं, थोड्याच वेळांत त्यानें पुनः माझ्या अंतर्बाह्य नेत्रांना आपलेकडे ओढून घेतलें.

आतां जो देखावा दृष्टीस पडला, तो इतक्या वेळच्या सर्व देखाव्यापेक्षांही फारच भव्य होता. वर पाहिलें ह्मणजे डोंगरावर मेघांची गर्दी झाली असल्यामुळें त्यांचीं टोकें पार आकाशास भिडून गेलीं आहेत असें वाटे. समोर सपाटीवर दूर दृष्टि दिली ह्मणजे आकाश खालीं येऊन पृथ्वीला मिळाल्यासारखें दिसे. आणि खालीं खोल पाहिलें ह्मणजे आपणही आपल्या जागेवरून उडी मारून खालच्या त्या एकंदर मिलाफांत मिळून जावें अशी चमत्कारिक इच्छा होई. तो प्रचंड देखावा पाहून मला आपली—एकंदर मानवजातीची—क्षुद्रता किती आहे, हें सहज मनांत उभें राहून, या एकंदर प्रचंड सृष्टीचा हेतु तरी काय? असें मनांत येऊन, माझें चित्त त्या अनादी कालापासून गूढांत गढलेल्या प्रश्नांत तल्लीन झालें. हा सर्व खटाटोप—हा सर्व अट्टाहास कां? कोठून? कसा उत्पन्न झाला? अत्यंत सूक्ष्म वस्तूपासून तों तहत अत्यंत प्रचंड वस्तूपर्यंत सर्वांस उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं आपलीं कायमचीं लागलींच आहेत. पदार्थमात्र उत्पन्न होतो, कांहीं वेळ असतो, आणि एकदां नाहींसा होतो, व त्याच्यावर दुसरे उत्पन्न होतात. हें कां असें? आस्तिक ह्मणतो हें सर्व परमेश्वराच्या इच्छामात्रें होतें. परंतु याच्यापलीकडे त्यास प्रश्न

विचारले, तर आग्रहापक्षीकडे त्याच्याजवळ उत्तर नाहीं. नास्तिक उत्तर करतो, "हें असेंच असायचें आणि असेंच व्हायचें. त्याला कांहीं सर्व शक्तिमान् असें आदिकारण नाहीं." ज्यास हा किंवा तो, कोणचाच पक्ष नाहीं— अर्थात् ज्यास आपल्या ज्ञानाची घमेंड नाहीं, उलट आपलें अज्ञान कबूल करण्याइतका विनय आहे, तो केवळ "हें सर्व अत्यंत अगाध आहे, अज्ञेय आहे, मनुष्याच्या परिमित बुद्धीला त्याचें मान कधींच होणार नाहीं, असें आहे," असें ह्मणून आपल्याशींच कष्टी होऊन बसतो. त्याला पहिल्याचें दुराग्रही, व दुसऱ्याचें उद्धत समाधान नाहीं. तो नेहमीं असंतुष्ट. असा या त्रयीचा विचार व त्याच्यावर आणखी सुचत जाणारे विचार, माझ्या मनास दुःख देऊं लागले व शेवटीं मी आपल्याशींच फार कष्टी होऊन निसर्ग कवि वुइलिअम ब्रिअंट याच्या "मनांत गाईलेल्या स्तोत्राचें" स्मरण केलें आणि विशेषतः पुढील ओळी—

My heart is awed within me when I think
Of the great miracle that still goes on,
In silence, round me the perpetual work.

पहिलेंच भांडण.

एक गोष्ट.

सीताबाई फार संतापून बोलत होती. "मी जरी त्यांची बायको असलें, तरी गुलाम नाहींना? लग्न लावलं तें बटीकपणा करण्यासाठीं नव्हे."

"शिते, शिते; असं बोलूं नये वेड्यासारखं. माझं ऐक तूं ह्मातारीचं."

"पण आजी, तूंच सांग. तूंच याचा न्याय कर. मी कांहीं बटीक आहे का घरांतली?"

"नाहीं. नाहीं. तूं अगदीं त्यांची बायको, पट्टराणी, घराची मालकीण—"

"झालं तर मग. मला त्यांनीं मालकिणीप्रमाणें, बायकोला योग्य तसा मान देऊन आणखी प्रेम करूनच वागवलं पाहिजे. बटकीप्रमाणें हवेतसे हुकूम करतील, तर मी कांहीं ऐकायची नाहीं."

"आतां तूं ज्या तऱ्हेनं बोलते आहेस हे तुझे शब्द जर त्यांनीं ऐकले, तर अगदीं मोठं प्रेम फुटेल नाहीं बरं त्यांना?"

"मला काय करायचं आहे त्यांच्याशीं ते जर मला अशा तऱ्हेनं वागवतील तर? आजी, ते तुमच्या वेळचे

दिवस आतां गेले. आतां आमचीं लग्नं झालीं ह्मणजे आह्मी बायका होतों. बटकी होत नाहीं समजलीस. आतां आह्मी कोणाचा शिरजोरपणा कधींसुद्धां सहन करून राहणार नाहीं."

"अगदीं वेडी. शिते, तूं अगदीं वेडी, यांत मला कसा तो काडीचासुद्धां संशय नाहीं. आणखी या वेडेपणाचं प्रायश्चित्तही तुला भोगावं लागेल, असं मला वाटतं. पोरी, जांवइबोआंच्याकडेच का सगळा दोष आहे ? तुझ्याकडे नाहीं का कांहीं? तुला आपले हक्क का फक्क काय ह्मणतेस ते जसे समजतात, तशींच जर तुझीं तुला कर्तव्यं समजतीं तर असं कधीं न बोलतीस. त्यांच्या घराण्यांत मी आज तीन पिढ्या पाहिल्या, पुरुष तेवढे मोठे तामसी. तेव्हां तूं आपल्या मऊपणानं त्यांच्या स्वभावांत फरक पाडायचा, का त्याला आणखी भर घालायाची ? ते तुला बोलले, तें मला सुद्धां आवडलं नाहीं, पण तूंही कांहीं त्यांना राग आणण्याजोगं बोलली नाहींस असं नाहीं. पहिल्यानं वाकडं बोललीस तूं. आणखी मग ते. तेव्हां पहिला दोष तुझा. त्यांचा नाहीं."

"आज माझ्या मनांत तुझ्याकडे यायचं होतं. मला आपलं वाटलं यावं ह्मणून. तर त्यांनीं मला कां आग्रह करावा इतका आपल्याबरोबर जाण्याचा ? माझा बेत ठरला होता इकडे येण्याचा. आणखी मीं एकदां बेत केला, ह्मणजे मग कधींसुद्धां तो बदलायची नाहीं, हें तुला ठाऊकच आहे. मग काय होईल तें होवो."

"बरं पण त्यांचाही तसाच स्वभाव आहे. तेव्हां कोणी तरी एका बाजूनं गम खाल्ली आणखी बेताबातानं घेतलं, तरच हें जमणार आहे. नाहीं तर भांडणन् तंटे या खेरीज दुसरं कांहींसुद्धां होणार नाहीं. कोणाला सुख लागणार नाहीं. आजपर्यंत जांवईबोआंनींच गम खाल्ली, तुला सांभाळून सांभाळूनच ते वागवीत आले."

" तूं असंच बोलायची ग. अगदीं तूं असंच बोलायची. माझ्याकडचं बोलणं कोणी सुद्धां बोलयचं नाहीं. मला ठाऊकच आहे. " इतकें ह्मणून सीताबाईनें आपलें रडण्याचें शस्त्र उपसलें.

इकडे रामचंद्रपंत संगीत सौभद्र पाहण्यास गेले होते. ते अगदीं पुढच्या खुर्चीचें तिकिट घेऊन बसले होते, परंतु त्यांचें चित्त तिकडे मुळींच लागेना. रामचंद्रपंताचा संसार थाटून सुमारें दोन महिनेच झाले असतील. त्यांची बी. ए. ची परीक्षा उतरून त्यांस नुकतीच मुंबईस नोकरी लागली होती, आणि त्यांनीं आपल्या बायकोस आणून स्वतंत्रपणानें आपण व आपली बायको मिळून राहण्याचें सुख अनुभवावयास लागल्यास दोनच महिने झाले असतील. ते मूळचे घरचेही सुखी असल्यामुळें केवळ चाकरीच्या पगारावरच अवलंबून रहावें लागत नसे. स्वतंत्र लहानशी बंगली, गडी, ब्राह्मण इतका सरंजाम बाळगून ते असत. अण्णासाहेब किर्लोसकरांनीं नवीन संगीत सौभद्र बसवून त्याचे

पहिल्यानेंच प्रयोग चालले होते. जवळ जवळ पांच प्रयोग झाले, पण यांनीं एकही पाहिला नाहीं. आणि मित्रमंडळींनीं तर त्यांचेपाशीं त्या नाटकाची अतोनात तारीफ करून तुह्मीं एकदां पहाच असा आग्रह केला. शिवाय बायकोही एकदां दोनदां ह्मणाली होती कीं, तें नाटक पहायला जाऊं ह्मणून. तेव्हां एके शनिवारीं आफिसांतून निघतांनां एका मित्रांचें व त्यांचें बोलणें झालें, तेव्हां पुनः त्याची शिफारस ऐकून व रात्रीपर्यंत थांबल्यास तिकिटें मिळणार नाहींत ह्मणून लागलींच थेटरापाशीं जाऊन त्यांनीं दोन अगदीं उत्तम दराचीं तिकिटें घेतलीं. आपण आज आधीं अगदीं कांहीं न कळवतां न सवरतां तिकिटें आणली तेव्हां आपल्या बायकोला किती तरी आनंद होईल, याचाच विचार त्याच्या मनांत येऊन, तो मोठा खुष होता, आणि जेवण्याची वगैरे व्यवस्था लवकर ठेवावी ह्मणून सुचविण्यासाठीं तो मग तडकच घरीं गेला. घरीं जातांच "आज आपण संगीत सौभद्राला जायचं ठरवलं आहे बरं का? जेवणाची तयारी लवकर करा." असें हंसत हंसत त्यानें ह्मटलें.

"ठरवलं आहे? कोणीं ठरवलं आहे?" सीताबाईनें हा प्रश्न इतक्या त्रासिकपणानें व कुऱ्यानें केला कीं, रामचंद्रपंताचं हंसूं सगळं पार मावळलं, व तोही अगदीं बदललेल्या आवाजानें ह्मणतो. "मीं ठरवलं आहे, निदान माझ्यापुरतं."

"तेंच ह्मटलं, आपल्यापुरतं ठरवलं तेंच ठीक. मी कांहीं यायची नाहीं." सीताबाईनें निक्षून तोऱ्यानें उत्तर दिलें.

" आपण येणार." रामचंद्रपंत पुनः किंचित् हंसत किंचित् निश्चयानें ह्मणाला. "आज मी दोघांच्यासाठीं तिकिटं आणलीं आहेत ; तेव्हां आपण दोघंही जाणार."

"मला विचारलं होतं का तिकिटं घेतली तेव्हां? मला नाहीं आज यायला व्हायचं. मला दुसरीकडे जायचं आहे."

" पण आज मी तिकिटं विकत घेऊन चुकलों आहे. मी तुला आणणार ह्मणून दुसरे स्नेहीही आपल्या बायकांना घेऊन येणार आहेत, तेव्हां आज आतां तुला आलंच पाहिजे. दुसऱ्या कुठें जायचं तें उद्यां गेलं तरी चालेल."

" नाहीं. आजच गेलं पाहिजे, आणखी मी जाणार."

"हा केवळ मूर्खपणा आहे." रामभाऊ ओंठ चावून ह्मणाला.

"जशास तसंच." सीताबाईनें आपल्या भिवया वर चढवून उत्तर दिलें.

पुनः रामभाऊंनीं शांतपणा धरला व ते निश्चयाच्या आवाजानें ह्मणतात, "हें बघ. तुला या माझ्या करण्यापासून खात्रीनं आनंद होईल असं समजून, आज मी तिकिटं विकत घेतलीं आहेत. नाटकाला प्रारंभ लवकर होतो, तर लवकर जेवणंखाणं आटपून तूं माझ्याबरोबर यावंस अशी माझी इच्छा आहे."

"असेल आपली इच्छा, पण ती तृप्त करणं माझ्या हातून होणार नाहीं. केवळ तुमच्याच इच्छेप्रमाणें वागायला मी कांहीं तुमची बटीक नाहीं."

त्या बोलण्यांत आणि त्या आवाजांत असा कांहीं एक विलक्षण प्रकार होता कीं, तो कानीं पडतांक्षणींच रामभाऊच्या अंगाचा संताप झाला. ते एकदम उठले आणि आपलें पागोटें चढवून तसेच घराच्या बाहेर चालते झाले. इकडे ते चालते झाल्याबरोबर सीताबाईचीही स्वारी चडफडत उठली आणि मुंबईंतच तिची आजी रहात असे तिच्याकडे निघून आली; व तेथें तिनें आपलें गाऱ्हाणें सांगितलें त्यावरच या गोष्टीच्या आरंभीं दिलेलें संभाषण झालें.

आजीचें शेवटलें बोलणें ऐकून आलेला रडण्याचा उमाळा ओसरल्यावर सीताबाईची आजी पुनः एकदां गंभीर आवाजानें तिला ह्मणाली, "पोरी, आज जो प्रकार घडला तो कदाचित् तुला अगदीं यःकश्चित् वाटत असेल, पण न जाणो, हाच तुझ्या कायमच्या दुःखाचा पाया होईल बरं. कोणाचाही मूळ अपराध असो, पण परिणाम असा होईल कीं, दोघांच्याही सुखाची अगदीं राखरांगोळी होईल. कांहीं कांहीं ठिकाणीं असल्याच यःकश्चित् गोष्टींवरून झालेल्या भांडणाचा किती भयंकर परिणाम झाला आहे याची तुला कल्पना तरी आहे का? पोरी यःकश्चित् बाबतींतल्या दुराग्रहानें कित्येक जोडप्यांच्या संसाराचा सत्यनास झाला आहे."

आजी बोलत असतां तिचा कंठ अगदीं भरून आल्याप्रमाणें दिसला. तिच्या डोळ्यांत आंसवें आलीं, आणखी ती एकदम पुढें ह्मणाली: "पोरी शिते, तुझ्यासारखीच एक हट्टी मुलगी होती. तिच्या नशिबानें तिलाही चांगला, पण

अभिमानी आणखी आपलं तें खरं करणार नवरा मिळाला. पहिल्यानं दोघं मोठीं सुखांत होतीं. बायको कुठें ठेऊं, आणखी कुठें न ठेऊं, असं त्यांना होऊन जाई. तिच्या तोंडून शब्द निघाला पुरे, कीं त्यांनीं झेललाच. पण पुढें ते कांहीं तिच्या मर्जीविरुद्ध करूं किंवा बोलूं लागले, कीं हिची तब्यत जाऊं लागली. आणखी त्यांचं एक, तर हिचं दुसरंच असं होऊं लागलं. पण असं किती दिवस चालणार? एक दिवस अगदीं यःकश्चित् बाबीवरून दोघांचं भांडण झालं. दोघांचीही संतापानें बोलाचाली झाली. दोघें एकमेकांना टाकून बोललीं. आणखी परिणाम........" पुढें त्या म्हातारीच्यानें बोलवेना. यामुळें ती थोडा वेळ थांबली व मग म्हणते: "परिणाम असा झाला कीं, ते निघून जाऊन पुनः आजन्म दोघांच्या गांठी पडल्या नाहींत." हें शेवटलें बोलणें बोलतांना म्हातारीचा गळा इतका भरून आला होता कीं, त्यायोगानें तिच्या मनांत नको होतें तें बाहेर पडतेंसें दिसलें.

"काय? कधीं गांठी पडल्या नाहींत?" सीताबाईनें एकदम विचारलें. तिच्या मनांत आतां निराळीच भीती उत्पन्न झाली, आणि ती फारच घाबरून गेली.

"नाहीं. आजन्मांत गांठी पडल्या नाहींत." गंभीरपणानें आजीनें उत्तर दिलें.

"कां? आजी, कां नाहीं पडल्या?"

"भांडण झालें त्या वेळीं त्यांना इतका संताप आला, इतका तिट्कारा आला, कीं घर सोडूनच ते थांबले नाहींत. मागल्या काळचीं माणसं तीं. ताबडतोब गांव सोडून

स्वारी काशीयात्रेला गेली! बायकोला अतोनात पश्चात्ताप झाला, पण काय करते बिचारी? तिनें आपल्याकडून पुष्कळ शोध केला. चार महिन्यांनीं काशीहून पत्र आलं, त्यांत लिहिलं होतं कीं, वांखा होऊन शेवट झाला." म्हातारी आतां अतोनात रडूं लागली. तिला तिचे अश्रू आवरेनात.

तें सर्व ऐकून सीताबाईच्या सगळ्या अंगाला कांपरेंच भरलें. ती पांढरी फटक पडली, आणखी घाबऱ्या घाबऱ्या आपल्या आजीला विचारते "आजी आजी हें खरं काग? ही खरी घडलेली का गोष्ट?"

"पोरी, अगदीं अगदीं खरी. ती अभागी बायको मीच. नशिबानं एक पोरगी झाली होती म्हणून तूं तरी दिसलीस. पोरी, भांडण अगदीं अस्संच यःकश्चित् कारणावरून झालेलं बरं. तेव्हां याच्यापासून कांहीं तरी धडा घे आणखी आजचं हें वेड्यासारखं भांडण चटकन् मिटवून टाक. ते आल्याबरोबर, क्षमा माग आणखी पुनः निश्चय कर कीं, एवढ्या तेवढ्या गोष्टीवरून रागावून रुसून आपला हेका चालवायचा नाहीं. द्यावंन् घ्यावं. आपण दिलं नाहीं, तर कोणी देणार नाहीं."

"पण आजी! आजी! आतां मुळीं परतच येणं नाहीं झालं तर?"

'छे. छे. इतकं नको कांहीं भ्यायला, परत येतील ते. अगदीं पहिल्याच भांडणाबरोबर घरदार सोडून चालते होणारे फार थोडे. पण एक भांडण झालं, दुसरं झालं, तिसरं झालं, असं होतां होतां मात्र मग

एखाद दिवशीं इतकं विकोपाला जायचं कीं, आवरायला यायचंच नाहीं. ह्मणून ह्मणत्यें, कीं आज ते घरीं परत येतांच आपलं मिटवून टाक कसं. या खेपेस तुझी चुकी आहे. तूं आज नसती आलीस माझ्याकडे तर चाललं नसतं? त्यांच्याबरोबर जायचं होतंस. त्यांनीं तिकिटं आणलीं ह्मणून सांगितल्यावर सुद्धां हेका कशाला केलास?

"–खरंच, आजी, माझ्या हातून मोठा वेडेपणा झाला. पण आजी, खरंचकाग आतां कोणीकडे तरी जायचं होईल? अग बाई, तसं जर झालं, तर मग माझं होणार तरी काय?"

एकदां ही कल्पना सीताबाईच्या मनांत येण्याबरोबर तिची अगदीं त्रेधा उडून गेली. आजीनें तिला किती सांगितलें तरी तिचें समाधान होईना. पुनः तिला वाटे कीं, आपल्या मूर्खपणामुळें आपल्यावर आजीसारखाच प्रसंग येणार, आणि असें वाटल्यानें ती एकसारखी रडूं लागली. तिला कांहीं दुसरें सुचेना. रात्रींचे दहा वाजले, आणि ती तशा रात्रीं आपल्या घरीं परत जाऊन नवऱ्याची वाट पाहात बसली. प्रत्येक क्षण तिला वर्षाप्रमाणें वाटूं लागला. बंगलीच्या आवाराच्या दारापासून तों बंगलीच्या दारापर्यंत ती हेलपाटे घालून घालून दमली. वेळ जातां जाईना.

इकडे रामभाऊ कांहीं वेळ नाटकाला बसला, परंतु त्याचें चित्त तिकडे मुळींच लागेना. त्याला तें सर्व नाटक विषाप्रमाणें वाटूं लागलें. आपण आपल्या बायकोसाठीं इतका जीव कीं प्राण टाकीत असतां, तिनें आपलें असल्या थोडक्या गोष्टींत सुद्धां ऐकूं नये, याचें त्याला फार वाईट

वाटलें. शेंवटीं तो तेथून उठून समुद्रावर हिंडायला गेला. परंतु तेथल्या थंडगार वाऱ्यानेंही त्याच्या डोक्यास व चित्तास शांति येईना. "आतां आपण पुनः घरीं जाण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. अगदीं यःकश्चित् गोष्ट, पण त्यांत सुद्धां तिनं आपलंच म्हणणं चालवावं. तिकिटं घेतलेलीं. बायकोला आणतों म्हणून स्नेह्यांनां सांगितलेलं. त्यांनीं आपल्या बायका आणल्या, आणखी माझ्या बायकोनं असं केलं. बेहत्तर आहे इथेंच चार घटका हिंडत राहून कोणीकडे तरी निघून जावं." असले विचार त्याच्या त्या क्षुब्ध मनांत चालले होते.

इकडे सीताबाई बारा वाजण्याच्या सुमारास अगदींच अधीर झाली व आतां आपण नाटकगृहापर्यंत जाऊन नवऱ्याचा शोध तरी करावा म्हणून निघण्याचा तिनें विचार केला. पण एवढ्या रात्रीं एकटी जाणार कशी आणि कोठें? तिला कांहीं सुद्धां सुचेना. तिला एक वाटे, कीं आपला नवरा आतां घरीं येणारच नाहीं. आणि असा विचार आला, म्हणजे मग मात्र तिला रडूं कोसळल्याखेरीज राहीना. "एकदां जर माझी गांठ पडेल, तर पुनः कधीं म्हटल्या कधींही भांडण होऊं देणार नाहीं" असा तिनें निश्चय केला. गड्याला, ब्राह्मणाला सगळ्यांना तिनें आपल्या नवऱ्याला शोधण्यासाठीं म्हणून पाठविलें; आणि बराच वेळ कोणीच परत येईना, तेव्हां थकून वर जाऊन खिडकीजवळच्या कोंचावर वाट पहात म्हणून बसली. तों तिचा डोळा लागला. त्या डुक-

लींत तरी काय? भयंकर स्वप्न; आणि तें स्वप्न, हें कीं, आपला नवरा आपल्याला टाकून कोणीकडे निघून गेला असून आपण त्याचा शोध करतों आहों. इतक्यांत त्याच्या-बद्दलच्या भयंकर बातमीची तार आली आणि ती फोडवून आपण कोणाकडून वाचवली. सुमारें तासभर जेमतेम तिचा डोळा लागला असेल, तों हा भयंकर स्वप्नाचा प्रकार झाला, आणि ती घाबरून धडपडून उठली. आपण कोठें आहों याचें तिला मुळींच भान नाहींसें झालें. जिकडे तिकडे सभोंवती अंधार. दिवा होता तो केव्हांच गेला. किती वेळ तरी तिनें आजूबाजूला चाचपडून पाहिलें. आपण पाहिलें तें स्वप्न. खरोखर स्थिति फार निराळी आहे असें समजून पुनः उठून उभी राहण्यास तिला जवळ जवळ पंधरा मिनिटें लागलीं. मग तिच्या लक्ष्यांत आलें कीं आपला नवरा अजून परत आला नाहीं, पण ना[illegible] ह्मणून तरी कशावरून? असा प्रश्न शेवटीं मनांत उभा राहून तिच्या अंगाचा थरकांप झाला! बिचारी एकटी दिवा लावण्यास आगपेटी सांपडेना. धडपडत धडपडत कशीतरी आगपेटी तिनें हुडकून काढली आणि दिवा लावून तिनें घड्याळाकडे पाहिलें तों सारा दीड वाजलेला. तेव्हां पुनः पहिल्याप्रमाणें खालीं जावें ह्मणून ती खालीं आली, तों काय? कोणाचा तरी श्वासोच्छ्वास चालला असून कोणीतरी ओटीवरच्या खोलींतल्या आरामखुर्चीवर निजलेलें आहे असें तिला वाटलें. दिवा पुढें करून

पहाते, तों रामभाऊ ! मग त्या हर्षाला काय विचारायचें आहे? एकदम तिच्या मुखांतून आनंदोद्गार बाहेर पडले, आणि तिनें त्याच्या गळ्यास मिठी मारली.

इकडे बागेवर कांहीं वेळ हिंडल्यानें पहिल्यानें जरी नाहीं, तरी मागाहून रामभाऊच्या मनास शांति आली, आणि अगदींच केवळ घर सोडून व बायको सोडून जाणें चांगलें नव्हे. घरीं जाऊन बायकोला पुनः एकदां तिची चुकी समजवावी. मात्र तिच्या या आजच्या हेकेखोरपणामुळें आपल्याला फार संताप आला आहे असें दाखवावें. असें मनांत येऊन त्यानें घरीं जातांच, ओटीवरल्याच खोलींत असलेल्या आरामखुर्चीवर पडून राहण्याचा बेत केला. आपली बायको कदाचित् आजीकडून आलीही नसेल असें त्याला एक वेळ वाटलें. एक वेळ वाटलें कीं, कदाचित् आली असेल. करितां कोणाला हांका वगैरे मारण्याच्या भानगडींत पडूं नये. ती जागी होईल. असा विचार करून तो वर सांगितल्याप्रमाणें सुमारें एक वाजतां येऊन पडला व त्यास डुकली लागली. वर सांगितल्याप्रमाणें त्यास पाहून सीताबाईनें मिठी मारतांच आणि 'चुकलें क्षमा करा' असें रडत रडत व स्फुंदत स्फुंदत ह्मणतांच त्याचा निश्चय पार नाहींसा होऊन त्यानेंही तिचें समाधान केलें हें सांगावयास नकोच. सांगावयाचें ह्मणून इतकेंच कीं, सीताबाईचा निश्चय पुढें अगदीं कायम राहिला. तें त्यांचें पहिलें भांडण शेवटचेंच झालें.

आमचे धर्मग्रंथ.

आम्ही आपणांस आर्य ह्मणवितों. आर्य ह्मणवून घेण्यांत आह्मांस अभिमान वाटतो. आह्मी ज्या भूमींत राहतों त्या भूमीस आह्मी आर्यभूमि असें ह्मणतों. आर्य ह्मणजे श्रेष्ठ, सुज्ञ; रानटी अथवा अज्ञ नव्हे. अर्थात् आर्यांची भूमि ती श्रेष्ठ व प्रज्ञ जनांची भूमि, आर्यांचा धर्म तो श्रेष्ठ व प्रज्ञ जनांचा धर्म; आर्यांचें शास्त्र श्रेष्ठ; आर्यांचें साहित्य श्रेष्ठ, असा आह्मी सतत अभिमान बाळगतों. आणि आर्यांचे ह्मणजे अर्थात् आमचे आदिग्रंथ ते सर्व पृथ्वीवरील धर्मांचे आदिग्रंथ होत असें आह्मीच नाहीं, परंतु सर्व प्रज्ञ जग ह्मणूं लागलें आहे. खरा आदिधर्म कोणता? याबद्दल वाद कसा असतो हें एका प्राचीन आख्यायिकेच्या रूपानें एका ग्रंथकारानें फार चांगल्या तऱ्हेनें दाखविलें आहे. ती आख्यायिका अशीः—एका चतुर गृहस्थाजवळ एक अगदीं अमोल अशी हिऱ्याची आंगठी होती, आणि त्याला तीन मुलगे होते. गृहस्थास काळजी पडली कीं, आपल्या मृत्युकाळीं ही आंगठी द्यावी कोणत्या मुलाला? आपल्या तिघां मुलांत जो गुणांनीं श्रेष्ठ असा ठरेल—त्याला द्यावी

असा त्यानें मनांत ठराव केला आणि निरनिराळ्या तऱ्हांनीं त्या मुलांची, त्यांना नकळत त्यानें परीक्षा केली. परंतु अमुक मुलगा दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ असें ठरविण्यास त्यास कांहींच कारण सांपडेना. सर्व मुलगे सर्व प्रकारांनीं सारखे आहेत असें पक्कें वाटल्यावरून त्यानें एका उत्तम कारागिरास बोलावून आणून त्याला ती मूळची आंगठी दाखविली आणि हुबेहुब तशा दोन नव्यां आंगठ्या करून आणण्यास सांगितलें. कारागीर मोठा हुशार होता. त्यानें आपलें काम असें बेमालूम ठेवून दिलें कीं, त्या दोन आंगठ्या पाहतांच तो गृहस्थ नुसता चाकित होऊन गेला व खरोखर बेमालूम काम केलें, कीं मूळ आंगठींत कांहीं विशेष आहे हें पाहण्यासाठीं त्यानें मूळ आंगठी त्या नव्या दोन आंगठ्याशेजारीं ठेविली. तीनही आंगठ्या इतक्या सारख्या भासल्या कीं, थोड्या वेळांत आपली मूळची आंगठी कोणची हें तो गृहस्थ स्वतःच विसरला. झालें. पुढें त्यानें आपल्या प्राणोत्क्रमणसमयीं तीन मुलांना पृथक् पृथक् बोलावून दुसऱ्याला न कळत ह्मणून एक एक आंगठी दिली. त्याचें प्राणोत्क्रमण झाल्यावर सर्वजण एकमेकांना ‘आपल्याला बापानें आपली मोठी आवडती आंगठी दिली’ असें ह्मणून आंगठी दाखवूं लागले आणि अर्थातच मूळची आंगठी—कीं, बाकीच्या दोन आंगठ्या जिच्या केवळ नकला होत्या ती—कोणची, याबद्दल वाद सुरू झाला. त्या तीन आंगठ्यांत मूळ आंगठी तर होतीच, परंतु ती कोणची

हें उमजेना. जो तो ह्मणे माझ्याजवळ आहे तीच मूळची ! त्याचप्रमाणें जगांतील आदि धर्मग्रंथांविषयीं झालें आहे. जो तो आपले ग्रंथ पुढें करून ह्मणतो, माझ्या धर्माचा आदिग्रंथ तोच मूळचा व सत्य. बाकीचे नवीन व बनावट. या वादाचा निकाल पूर्णपणें लागणें फार कठिण. तथापि भाषाशास्त्र व जुन्या ग्रंथांत सांपडणारी ज्योतिःशास्त्रसंबंधी माहिती यांनीं हल्लीं हा वाद मिटविण्याचें आरंभिलें आहे. बहुतेक प्रज्ञ लोक आमच्या आर्यधर्मग्रंथांस आदिग्रंथ—कीं जे इतर सर्व धर्मांचें मूळ—असें समजतात. ज्याप्रमाणें नदीचें मूळ केवळ करंगळी इतक्या प्रमाणाचें असून पुढें तें जलधिसमान होतें, त्याप्रमाणेंच मूळ ग्रंथ जे वेद, ते जरी अल्प वाटले, तरी त्यांचा पुढचा विस्तार फारच मोठा झाला. ह्मणून मूळ कोणचें हें विसरून जातां कामा नये. आमचा ऋग्वेद हा आदिवेद. तोच आदिग्रंथ आणि त्याच्यापासून पुढें आमच्या इतर ग्रंथांचा व इतर धर्मांच्या आदिपुस्तकांचा उद्भव झाला ही गोष्ट भाषाशास्त्रानें आज निर्विवाद करण्याचें श्रेय घेतल्यासारखेंच झालें आहे. अर्थातच आह्मांस अभिमान वाटतो त्यास कारण आहे. हें कारण असल्यामुळें आह्मी अभिमान बाळगावा हें ठीक आहे, परंतु थोडी दुःखाची गोष्ट ही कीं, आमचे धर्मग्रंथ कोणचे व त्यांत काय आहे हें आमचें आह्मांस कळेनासें झालें आहे ! इतकेंच नव्हे, तर आमच्यापैकीं बहुतेकांना आमच्या ग्रंथांचीं नुसतीं नांवें-

3

सुद्धा ठाऊक नाहींत, असें झालें आहे. वेदातील विशेष शब्दाचा यास्क नांवाच्या प्राचीन ऋषीनें एक कोश बनविला आहे. त्याच्या प्रारंभीं ह्मटलें आहे:—

स्थाणुरयं भारवाहः किलाभूद्
अधीत्य वेदं न विजानाति योऽर्थम् ।

वेदांचा अर्थात् आपल्या आदिधर्मग्रंथांचा अर्थ न समजून, जो त्याचें नुसतें पठन करतो, तो केवळ मूर्ख व भारवाहकच होय. कांहीं वर्षांपूर्वीं वेदांचें नुसतें पठन तरी होत होतें. आतां तर तेंही नाहींसें झालें आहे. इतकें कीं, त्या वेदग्रंथांचीं नांवेंही आपणांपैकीं पुष्कळांस ठाऊक नाहींशीं झालीं आहेत. हें होणें इष्ट नाहीं. सबब आह्मीं त्या ग्रंथांची थोडक्यांत माहिती देण्याचा विचार केला आहे.

ज्या शास्त्रांच्या समुदायानें भारतवर्षाचें खरें खरें नांव राखिलें, तीं शास्त्रें एकीकडेच राहून पुराणग्रंथांचाच पुढाकार झाला आहे; आणि कांहीं पुराणें तेवढीं लोकांच्या नजरेपुढें राहून मुख्य ग्रंथांचें आगदींच विस्मरण झालें आहे. हे ग्रंथ असंख्य आहेत; परंतु त्यांपैकी कांहीं मुख्य मुख्य ग्रंथांची माहिती येथें देतों.

आमच्या शास्त्रग्रंथांचे समुदाय पांच धरावे. १ वेद वेदांग व उपवेद, २ दर्शन, ३ स्मृति, ४ इतिहास व पुराण आणि ५ तन्त्र. त्यांपैकीं पहिला समूह:—

वेद, वेदांग व उपवेद.

वेद मूळचे तीन. अत्यंत प्राचीन ग्रंथांत त्रयी ह्मणजे वेदत्रयी असें अनेकवार आढळतें. चवथा वेद ज्या वेळीं लोकांत प्रचलित नव्हता असा काळ होता यांत शंका नाहीं; परंतु आज बरींच शतकें वेद ह्मणजे चार असा लौकिक समज आहे. हे अनुक्रमें १ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद व ४ अथर्ववेद असे होत. प्रत्येक वेदाचे चार भाग मानले आहेत. ते १ संहिता अथवा मूळ मंत्र. २ ब्राह्मण. ३ उपनिषत् अथवा अरण व ४ सूत्र. वेदमंत्रांच्या कांहीं कांहीं भागांस शाखा ह्मणतात. मंत्रांत कोणत्या तरी देवतेची स्तुति किंवा तिला आवाहन असतें. ब्राह्मणांत आरण्यक ह्मणून एक पोटभाग आहे. या ब्राह्मणांत यज्ञयागादिक कृत्यांत व आचारांत कोणकोणच्या वेळीं कोणकोणचे मंत्र ह्मणावे आणि त्या त्या मंत्रांविषयीं व यज्ञयागांविषयीं माहिती पूर्वीच्या महदाख्यायिका असतात. उपनिषद् भागांत बहुशः वेदांतभाग असतो. पूर्वीच्या अमुक ऋषीनें अमक्या दुसऱ्या ऋषीस किंवा अमुक राजानें अमक्या ऋषीस अध्यात्मविद्येसंबंधी प्रश्न केला आणि त्याचें उत्तर ह्मणून त्या ऋषीनें अध्यात्म विचारांची सुंदर फोड करून अगर एखादी आख्यायिका किंवा रूपक करून, उपदेश केला असें वर्णन असतें. सूत्रग्रंथांचे दोन भाग आहेत; एक गृह्य व दुसरा श्रौत. गृह्यसूत्रांत निरनिराळ्या स्थितींतल्या

व्यक्तींनीं अगर निरनिराळ्या स्थितींत असणाऱ्या एकाच व्यक्तीनें आपल्या जन्मापासून तों मरणकालपर्यंत स्वतःचें सांसारिक व पारमार्थिक वर्तन कसें ठेवावें याबद्दल थोडक्यांत माहिती असते. श्रौतसूत्रांत त्यानें यज्ञयागादिक करितांना किंवा होमहवन करितांना कोणचे मंत्र ह्मणावे व कोणच्या कृति कराव्या याची माहिती दिलेली असते. यजुर्वेदाचे दोन भाग आहेत १ शुक्लयजुर्वेद व २ कृष्णयजुर्वेद. या दोनही भागांस प्रत्येकी संहिता, ब्राह्मण, उपनिषत् व सूत्र असे चार चार भाग आहेतच. वेदाचें पठन करण्यास सहायभूत अशीं कांहीं शास्त्रें आहेत त्यांस वेदांग ह्मणतात. वाचकांच्या ज्ञानाकरितां प्रत्येक वेदाचे निरनिराळे भागविभाग स्पष्ट तऱ्हेनें देतों.

ऋग्वेद.

१. संहिता—अर्थात् या वेदाच्या सर्व ऋचा—सर्व मंत्र-मिळून झालेली.

२. ब्राह्मण—ऐतरेय ब्राह्मण व ऐतरेय आरण्यक.

३. उपनिषत्—ऐतरेयोपनिषत् व कौषीतकी.

४. गृह्यसूत्र—सांख्यायन आणि आश्वलायन.

श्रौतसूत्र—सांख्यायन व आश्वलायन.

यजुर्वेद.

कृष्ण यजुर्वेद.

१. संहिता—तैत्तिरीय.

२. ब्राह्मण—तैत्तिरीय ब्राह्मण—तैत्तिरीय आरण्यक.

शाखा—१ मैत्रायणी, २ कठ.

३. उपनिषत्—तैत्तिरीयोपनिषत्, २ मैत्री अथवा मैत्रायणी, ३ कठ, ४ श्वेताश्वतर.

४. गृह्यसूत्र—बौधायन व आपस्तम्ब

श्रौतसूत्र—बौधायन व आपस्तम्ब.

शुक्ल यजुर्वेद.

१. संहिता—वाजसनेय संहिता.

२. ब्राह्मण—शतपथ ब्राह्मण.

शाखा—१ माध्यंदिनी २ काण्व ३ कात्यायन.

३. उपनिषत्—ईशोपनिषत्, बृहदारण्यकोपनिषत्.

४. सूत्र—गृह्यसूत्र पारस्कर व श्रौतसूत्र कात्यायन.

सामवेद.

१. संहिता—आर्चिक संहिता.

२. ब्राह्मण—१ षड्विंश ब्राह्मण, २ पंचविंश ब्राह्मण व ३ ताण्ड्यमहाब्राह्मण.

शाखा—१ तलवकार, २ कौथूमी, ३ राणायनी.

३. उपनिषत्—तलवकार अथवा केनोपनिषत् २ छान्दोग्योपनिषत्.

४. सूत्र—गृह्यसूत्र—गोभिल कृत. श्रौतसूत्र—१ लाट्यायन कृत व २ गोभिल कृत.

अथर्ववेद.

१. संहिता.

२. ब्राह्मण—गोपथ ब्राह्मण.

३. उपनिषत्—मुण्डकोपनिषत्, माण्डूक्योपनिषत् व प्रश्नोपनिषत्.

४. सूत्र—कौशिकसूत्र.

उपनिषदांची संख्या शंभर दीडशांहून अधिक आहे. परंतु त्यांत दहा काय तीं प्रधान मानलीं आहेत. तीं १ ईश. २ केन. ३ कठ. ४ प्रश्न. ५ मुण्ड. ६ मांडूक्य. ७ ऐतरेय. ८ तैत्तिरीय. ९ छान्दोग्य व १० बृहदारण्यक. यासंबंधानें एक श्लोक आहे तो असाः—

ईशकेनकठप्रश्नमुण्डमाण्डूक्यतित्तिरिः ।
छान्दोग्यं बृहदारण्यमैतरेयंतथादश ॥

या दहा व आणखी दोन तीन उपनिषदांवर श्रीमच्छंकराचार्यांनीं फार चांगल्या टीका केल्या आहेत, त्यांस भाष्यें ह्मणतात. वेदांसंबंधानें एवढी माहिती झाली. आतां वेदांगें काय तीं पाहूं.

वेदांग.

हीं अंगें सहा आहेत. यावरूनच वेदास 'षडंग वेद' असें ह्मणतात, हीं अंगें अशीं—१ पाणिनीकृत शिक्षा. २ व्याकारण. ३ यास्ककृत निरुक्त अथवा वेद—शब्दांचा कोश. ४ पिंगलकृत छन्दस् ह्मणजे वृत्तरचनेसंबंधानें

माहिती. ५ गर्ग आदिकरून अठरा ऋषींनीं केलेल्या ज्योतिःसंहिता—ज्योतिःशास्त्र. ६ कल्पशास्त्र. हीं सहा वेदाचीं अनुक्रमें १ नाक, २ मुख, ३ कान, ४ पाय, ५ नेत्र व ६ हात इत्यादि अंगें होत. यासंबंधी पाणिनीच्या शिक्षेंत पुढील श्लोक आहेः—

छन्दः पादौ तु वेदस्य हस्तौ कल्पोथ पठ्यते ।
ज्योतिषामयनं चक्षुः निरुक्तं श्रोत्रमुच्यते ॥
शिक्षा घ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम् ।
तस्मात्सांगमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते ॥

सगळ्या वेदांचीं वर जीं सूत्रें दिलीं आहेत त्यांना समुदायानें कल्पशास्त्र असें साधारणतः ह्मणतात. त्या कल्पशास्त्राकाच वेदांचें एक अंग ह्मटलें आहे. याच प्रमाणें अत्यंत प्राचीनत्वामुळें किंवा अत्यंत श्रेष्ठत्वामुळें वेदतुल्य असे आणखी कांहीं ग्रंथ आहेत त्यांस उपवेद ह्मणतात. हे उपवेदही चार आहेत. ते असेः—

उपवेद.

१. धन्वंतरि प्रणीत—आयुर्वेद.
२. विश्वामित्र प्रणीत -धनुर्वेद.
३. भरतमुनि प्रणीत—गन्धर्ववेद.
४. अनेकमुनि प्रणीत—अर्थशास्त्र किंवा वेद.

दर्शनें.

दर्शनें ह्मणजे पाहण्याच्या पद्धती. सर्व विचारी मानवजातीस अत्यंत महत्त्वाचा असा जो अध्यात्मविषय त्याचा

विचार निरनिराळ्या ऋषींनीं निरनिराळ्या प्रकारांनीं केला आहे. अर्थात् एकाच अत्यंत गूढतत्त्वाकडे निरनिराळ्या दृष्टीनें पाहून आपापले अनुभव व विचार आपापल्या ग्रंथांत लिहून ठेविले आहेत. या ग्रंथांस दर्शनें ह्मणतात. हीं दर्शनें ६ आहेत.

१. कपिलकृत—सांख्यदर्शन.

२. पतञ्जलिकृत—योगदर्शन.

३. गौतमकृत—न्यायदर्शन.

४. कणादकृत—वैशेषिकदर्शन.

५. जैमिनिकृत—पूर्वमीमांसादर्शन.

६. व्यास अथवा बादरायणकृत उत्तरमीमांसा अथवा वेदांतदर्शन.

हीं सहा दर्शनें फार प्राचीन. यांखेरीज रामानुज, पाशुपत, माध्व इत्यादि नवीन दर्शनें पुष्कळ आहेत.

स्मृति.

समाज जेथें आला, तेथें व्यक्तीव्यक्तींनीं परस्परांशीं कसें वर्तन ठेवावें व स्वतःचें वर्तनही दुसऱ्याला उपसर्ग न पोंचतां कसें ठेवलें जावें याबद्दलचे कायदे आलेच. अशा कायद्यांचे कर्ते ऋषि ते धर्मशास्त्रकार, व त्यांनीं घालून दिलेले कायदे सामग्र्येंकरून धर्मशास्त्र या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांस स्मृति असेंही नांव आहे. त्यांत अत्यंत मुख्य असे वीस ऋषि असून त्यांच्या स्मृति फार मान्य

आहेत. त्यांच्या नांवांची मालिका गोवकेले दोन श्लोक पुढें दिले आहेत.

मन्वत्रिविष्णुहारीत याज्ञवल्क्योशनोऽगिराः ।
यमापस्तम्बसंवर्ताः कात्यायनबृहस्पती ॥
पराशरव्यासशंखलिखिता दक्षगौतमौ ।
शातातपोवसिष्ठश्च धर्मशास्त्रप्रयोजकाः ॥

१ मनु, २ अत्रि, ३ विष्णु, ४ हारीत, ५ याज्ञवल्क्य, ६ उशन, ७ अंगिरा, ८ यम, ९ आपस्तम्ब, १० संवर्त, ११ कात्यायन, १२ बृहस्पती, १३ पराशर. १४ व्यास, १५ शंख, १६ लिखित, १७ दक्ष, १८ गौतम, १९ शातातप, २० वसिष्ठ, हे धर्मशास्त्राचे मुख्य उत्पादक होत. यांखेरीज नारदादि अनेक मुनीही स्मृतिकार होऊन गेले.

इतिहास.

आतां इतिहास ग्रंथांची माहिती पाहूं. रामायण आणि महाभारत हे दोन ग्रंथ इतिहासग्रंथांत अत्यंत प्रधान. दुसरे कित्येक इतिहास होते, पण ते हल्लीं पुराणांत मिसळून गेले आहेत. इतिहास आणि पुराण यांत अंतर आहे.

पुराणें.

ह्या पुराणांत दोन भाग आहेतः १ महापुराणें व २ उपपुराणें. हीं दोन्ही प्रत्येकीं १८ आहेत. महापुराणें—१ ब्रह्म, २ पद्म, ३ विष्णु ४ वायु, ५ लिंग, ६ गरुड,

७ नारदीय, ८ भागवत, ९ अग्नि, १० स्कन्द, ११ भविष्य, १२ ब्रह्मवैवर्त, १३ मार्कण्डेय, १४ वामन, १५ वराह, १६ मत्स्य, १७ कूर्म, १८ ब्रह्मांड.

हीं सर्व पुराणें लक्ष्यांत रहावीं ह्मणून कोणीं एक खुणेचा श्लोक केला आहे तो असाः—

मद्वयं भद्वयंचैव ब्रत्रयं वचतुष्टयं ।
नालिपाग्नि तथा कूस्कं गारुडमेवच ॥

ज्यांचीं नांवें मनें आरंभ होतात अशीं दोन; भनें आरंभ होणारीं दोन; ब्रच्या आरंभाचीं तीन, वच्या आरंभाचीं चार आणि बाकी ना, लिं, प, अ, कू, स्कं, यांनीं आरंभ होणारीं व गरुड पुराण.

हीं कोणकोणचीं हें ओळखणें आतां काठिण नाहीं.

उपपुराणें.

१ आदित्य, २ औशनस, ३ कल्कि, ४ कापिल, ५ कालिका, ६ दुर्वासस्, ७ नन्दी, ८ नारदीय अथवा बृहन्नारदीय, ९ नृसिंह, १० पाराशर, ११ भार्गव, १२ माहेश्वर, १३ वारुण, १४ वासिष्ठ, १५ शाम्ब, १६ शिव, १७ सनत्कुमार, १८ सौर. यापेक्षां आणखी निराळीं आदि, मानव, मुद्गल, भविष्योत्तर, गणेश, बृहद्धर्म वगैरे कित्येक उपपुराणें आहेत. त्यांचींही नांवें या अठरांत घालून या अठरांतलीं कित्येक गाळलीं जातात. कालीपुराणांत १८ उपपुराणांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांत

मारीच, ब्रह्मांड, वामन व कार्तिकेय हीं पुराणें धरलीं आहेत. हीं पुराणें व उपपुराणें रचण्याच्यापूर्वी कांहीं पुराणसंहिता ह्मणून होत्या. त्या १ स्वतः व्यासानें लिहिलेल्या संहिता. २ लोमहर्षणिक संहिता व ३–५ कश्यप, सावर्णि व शांशपायन या ऋषींनीं केलेल्या संहिता. संहितांचा उल्लेख कोठें कोठें असतो. पुराणसंहितांच्या नमुन्यावर किंवा आधारावर भिन्न भिन्न पुराणें रचिलीं गेलीं. परंतु कोणच्या संहितांवर कोणचीं पुराणें रचलीं गेलीं हें आज मितीस सांगतां येणें अशक्य आहे.

तंत्रग्रंथ.

पुराणांप्रमाणें तंत्रेंही फार आहेत. त्यांत महानिर्वाण, कुलार्णव, ज्ञानसंकलिनी, कुलकुंडलिनी, रुद्रयामल, बृहन्नील, वाराही, गौतमीय, मातृकाभेद, कामधेनु, विश्वसार, कामाख्या, मन्त्रकोष, इत्यादि अत्यंत प्रधान आहेत.

प्रधान प्रधान शास्त्रग्रंथांची ही यादी दिली आहे व क्वचित् क्वचित् कोणच्या ग्रंथांत काय असतें त्याचाही परिचय करून देण्याचा यत्न केला आहे. घटकाभर करमणुकीच्या वाचकांना याच्यापेक्षां अधिक माहितीची आवश्यकता नाहीं. तथापि यापेक्षां थोडी अधिक माहिती क्रमवार केव्हां केव्हां देत जाऊं. ही दिलेली माहिती मात्र वाचकांनीं वाचून ध्यानांत धरावी.

जिऊबाईचीं मुलेंलेंकरें.

जिऊबाई कोण? त्यांचीं मुलेंलेंकरें कोण? त्या राहतात कोठें? करतात काय? हे प्रश्न, वरचा हा माथळा वाचून कितीकांच्या तरी मनांत उभे राहतील! त्यांत आणखी मीं जर त्यांस असें सांगितलें कीं, "जिऊबाईचीं लेंकरें जिथें नाहींत अशी जागा या पृथ्वीवर तर कोठें नाहीं, इतकेंच नव्हे, तर अंतराळांत देखील कोठें नाहीं," तर मग त्यांच्या आश्चर्याला अगदीं पारावरच नाहींसा होईल. या आपल्या पृथ्वीवरून जिऊबाईचीं सारीं मुलेंलेंकरें नाहींशीं करून टाकलीं, किंवा तींच आपोआप नाहींशीं झालीं, तर काय स्थिति होईल, याची कल्पना तरी कधीं कोणास होईल काय? जन्माला आल्या क्षणापासून तों मरणाच्या क्षणापर्यंत जागृतावस्थेंत असतांना आपल्या नजरेसमोर एक—दोन—चार—जिऊबाईचीं कांहीं तरी मुलें दिसतच असतात. निदान त्यांनीं बनकेले अगर बनविलेले पदार्थ तरी आपल्या दृष्टीस पडत असतात. अहो, आपल्या खोलींतकें लांकडी सामान —प्रत्यक्ष खोलीचीं दारें हीं या सर्वव्यापी जिऊबाईच्या लेंकरांखेरीज झालीं असतीं कशीं! आपल्या भितीला सार-

वण लावतां तें, केव्हां केव्हां कागद चिकटवितां ते, आमच्या खोलींत आंथरलेलीं जाजमें, अंगांत घालायचे कपडे, हे झाले कसे? जिऊबाईच्या लेंकरांखेरीज आलें कोण त्यांना करायला? अहो, एवढ्यानेंच संपलें नाहीं; तर मोठमोठाल्या वाड्यांच्या संगमरवरी जमीनी देखील जिऊबाईच्या कांहीं उद्योगी लेकरांच्या श्रमाचेंच फळ होय. त्यांनीं आपल्यासाठीं बनविलेल्या शिंपांच्या घरांचाच पुढें संगमरवर बनतो! जिच्यावर आमचा श्वासोच्छ्वास चालतो ती हवा तर जिऊबाईच्या अदृश्य अशा असंख्य लेंकरांनीं अगदीं व्यापून गेली आहे. जिऊबाईचीं मुलेंलेंकरें पहाण्यास आपल्याला शहर सोडून जावें लागत नाहीं. एक तर आपण तिच्या सगळ्यांत श्रेष्ठ मुलांपैकींच आहोंत. दुसरे असें कीं, कोठें पाहिजे तेथें जरी पाहिलें, तरी आपणांस आपलीं लहान मोठीं भावंडें दिसणारच ह्मणून समजावें. अंमळ कोठें आडोशाची अगर पडकीशी जागा सांपडली कीं, पिंपळाच्या अंकुरांनीं डोकें वर काढलेंच ह्मणून समजावें. एखाद्या भिंतीला पडलेल्या फटींतून, एखाद्या विहिरीच्या कपारींतून, पिंपळा-वडाचें झाड, निदान गवताची एखादी काडी तरी बाहेर डोकावतांना कोणी पाहिली नसेल? मला वाटतें ज्यां ठिकाणीं एक किडा देखील सरपटतांना, उडतांना अगर आपलें जाळें पसरतानां दिसत नाहीं अशीं जागा एक देखील आपणांस आढळावयाची नाहीं. मात्र माणसानें त्यांचा संहार करतां कामा नये.

शहरापासून अगदीं दूर, शांत अशा खेडेगांवच्या प्रदेशांत गेलों ह्मणजे तर जिऊबाईच्या संसाराचा प्रचंड पसारा पाहून मन थक्क झाल्याखेरीज कधींच रहावयाचें नाहीं. आपल्या मुलांलेकरांकडून व्यापविल्याखेरीज एक अंगुळभर जागा देखील त्या ठेवीत नाहींत. कोठें अगदीं लहान लहान लेंकरांस त्या जन्म देत आहेत; कोठें गगनाला हात घालूं ह्मणणाऱ्या दुसऱ्या अपत्यांस वाढवीत आहेत; कोठें दलदलीच्या अगर घाणेरड्या पाणथळांत देखील त्यांची अपत्यममता दृष्टीस पडते. झाडाच्या सावलींत, संथ असलेल्या पाण्यांत, आपलें भक्ष्य शोधीत असलेल्या गोळणी पहाव्या, त्याचप्रमाणें श्वासोच्छ्वास करण्यासाठीं क्षणोक्षणीं वर डोकें करून पुनः बुड्या मारणारे बेडूक आदिकरून प्राणी पहावे,—एवढें कशाला? पाण्याच्या अगदीं सपाटीच्या जवळ दृष्टि नेऊन पाहिलें, ह्मणजे किती बारीक प्राणी दिसतात बरें? किती घुंगुरडीं? किती पाणपिसा! अरेरे काहीं अनर्थ! एवढेंच नव्हे तर वाऱ्याच्या झुळकेनें एका बाजूस गोळा होणाऱ्या केंसांत दृश्य किंवा सूक्ष्मदर्शकावांचून दिसणें शक्यच नाहीं असे असंख्य प्राणी असतात!

सपाट जमिनीवरून, दऱ्याखोऱ्यांतून, डोंगरांबिगरांतून आपण हिंडूं लागलों, ह्मणजे तर सरपटणारे, फरपटणारे लहानमोठे जीवजंतु आपल्या दृष्टीस किती पडतात याची कोणी गणती करूं शकेल काय! कित्येक दाट उगवलेल्या गवतांत अगर शेंवाळांत झांकून गेलेले असतात; कांहीं

झाडांच्या पानांत गुरफटून गेलेले असतात; कांहीं आपल्या नैसर्गिक हत्यारांनीं झाडाचे मोठमोठाले बुंधे पोंखरून, कांहीं जमिनींत बोगदे पाडून, आणि कित्येक तर प्रचंड खडक कुरतडूनही आपला मार्ग काढीत असतात! दुसरी-कडे सिंहव्याघ्रादि हिंस्र प्राणी, व गेंडे हत्ती वगैरे इतर प्राणी खुशाल रानांवनांतून हिंडत असतात. बिचाऱ्या मनुष्याची त्या ठिकाणीं यत्किंचित् देखील मातब्बरी नाहीं. आपल्या शेताबितांच्या आसपासच्या रानांत ससे कोल्हे वगैरेंचा तर कोण सुळसुळाट होतो!

एवढें सगळें लिहिलें आहे. यावरून आमच्या जिऊ-बाई कोण, आणि त्यांच्या संसाराचा व्याप केवढा आहे, याची माहिती वाचकांस थोडीबहुत तरी झालीच असेल. त्यांची मुलेंलेंकरें जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, हवेंत वाऱ्यांत, अमुक ठिकाणीं ह्मणजे नाहींत असें नाहीं. समुद्रांत सुद्धां या बाईचा संसार सगळीकडे पसरलेलाच! आणि तो दोनही तऱ्हेच्या मुलांकडून. झाडांकडून आणि प्राण्यांकडून! समुद्रांत जितके जीवजंतू दिसतात तितके-सुद्धां असंख्य आहेत, मग नुसत्या डोळ्यांनीं दिसत नाहींत, असे किती आहेत याची काय सीमा सांगावी? एकंदरींत इत्यर्थ हा कीं, कोठेंही जा, जिऊबाईच्या संसाराखेरीज आणि तिच्या मुलांलेंकरांखेरीज तुह्मांला कांहींही प्रचंड दिसावयाचें नाहीं.

जमिनीवर जा, अगर महासागराच्या अत्यंत खोल अशा

उदरांत जा; अशी एक यवभरही जागा नाहीं कीं, जींत जिऊबाईचीं असंख्य लेंकरें नाहींत. परमेश्वरानें जिऊबाईला आज्ञाच केली आहे कीं, " बाईगे, तूं असंख्यप्रसू—ह्मणजे अगणित लेंकरांची जननी—हो, आणि त्यांच्याकडून सर्व अंतराळ सदोदित भरून ठेव. अगदीं यत्किंचित् जागा देखील रिती ठेवतां कामा नये." मग काय विचारतां? प्रत्यक्ष परमेश्वराचा असा वरप्रसाद झाल्यावर आणखी काय पाहिजे? जिऊबाईनें परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें यथास्थित वर्तन ठेविलें आहे. तिची प्रजा एकसारखी वृद्धि पावत आहे. उत्पन्न होत असलेल्या प्रजेला रहायला जागा असो, नसो, तिकडे तिचें यत्किंचित् देखील लक्ष्य नाहीं.

शेजारच्या मोठ्या झाडाच्या मुळांच्या जाळ्यांत सांपडून आपण मरूं. हा विचार क्षणभर देखील मनांत न आणितां लहान लहान रोंपडीं आपलीं डोकीं वर काढीतच असतात. दर क्षणाला एक नाहीं, दोन नाहीं, कोट्यानुकोटि जीवजंतु उपजतात आणि रहायला जागा नाहीं, खायला अन्न नाहीं यामुळें दुसऱ्याच क्षणाला नष्टही होतात. आज आपण अशी कल्पना करूं या कीं, जगांत एकच झाड आहे; आणि एका वर्षांत त्याला फक्त पन्नासच बीजें येतात. आतां असेंही समजूं कीं, त्या झाडाचा वंशविस्तार एकसारखा होत गेला; एका देखील बीजाचा कधीं नाश झाला नाहीं; तर सुमारें नऊ वर्षांच्या आंतच अशी स्थिति

येईल कीं, पृथ्वीवर त्या झाडाच्या रोपड्यावांचून एक यव-भरही रिती जगा रहाणार नाहीं! त्याचप्रमाणें, असें समजू कीं आज पृथ्वीवर पक्ष्यांचा एकच जोडा आहे, आणि दर-साल त्यांस फक्त चार पिलें—दोन जोडेच—होतात असें मानूं. आतां यांचाही वंशविस्तार जर अगदींच अविच्छिन्न चालला, तर बरोबर पंधरा वर्षांत २०,००,००,००,००० दोन खर्व पक्षी होतील!

परमेश्वरानें जिऊबाईला याप्रमाणें "अनंतापत्या सौभाग्यवती भव!" असा आशीर्वाद दिला, व तो खराही करून दाखविला, त्याप्रमाणेंच जर तीं सर्व अपत्यें अनंत आयुष्याचींही केलीं असतीं, तर पृथ्वीतलाची फारच त्रेधा उडाली असती! परंतु त्याच्याच कृपेनें तशी तर कांहीं स्थिति झाली नाहीं. त्यानें जिऊबाईचा कुसवा जरी अनंतप्रसू केला तरी त्या अपत्यांस अमरत्व दिलें नाहीं.

असें जर आहे तर "मग तिला असा अनंत अपत्यें होण्याचा आशीर्वाद तरी कां दिला? थोडींच अपत्यें होऊन तीं चिरकाल रहाणारीं, सदा सुखी अशीं होतील, असें कां नाहीं केलें? जन्माला आलीं, तर कित्येक आधीं फार वेळ तगत नाहींत; कांहीं वेळ जगलीं, तर त्यांना खायला मिळण्याची मारामार, रहण्याची मारामार, असें कां?" असे प्रश्न आपल्या मनांत येऊन आपल्या मनाचा किती बरें गोंधळ होतो? आणि तें बरोबर आहे. जगांत येऊन सुखानें जगायला सांपडेल, तर तें जगणें; नाहीं तर त्यांत अर्थ

काय ? मग न जन्मलेलेंच बरें. कुसंतानापेक्षां निसंतान बरें. दहा पोरें होऊन साऱ्यांनींच अन्नान्न करीत तडफडण्यापेक्षां मुळींच न झालेलीं, किंवा एखादुसरेंच झालेलेंच काय वाईट.

होय, सारी गोष्ट खरी; पण जिऊबाईच्या अपत्यांचा विचार निराळा.

आह्मी वर सांगितलेंच कीं, जिऊबाईला परमेश्वरानें "अनंतानंतपुत्रासौभाग्यवतीभव" असा आशीर्वाद दिल्यामुळें तिची प्रजा दर क्षणास खूप वाढत आहे. आणि खूप मरतही आहे. कोणी ह्मणेल, असें होतें त्यापेक्षां पुष्कळ वर्षे टिकणारीं अशींच मुलें लेंकरें जिऊबाईला कां होत नाहींत ? याचें उत्तर एवढेंच कीं, जिऊबाईच्या मुलांचा प्रकारच निराळा आहे. इतरांचीं मुलें एकमेकांस एकमेक खाऊन आपला निर्वाह करीत नसतात. जिऊबाईचीं मुलें एकमेकांना खाऊन आपला निर्वाह करितात ! तुह्मी असा विचार करा कीं, जिऊबाईचीं मुलें जगतात कशावर ! झाडें, हीं जिऊबाईचीं मुलें. हीं पाण्यावर व हवेवर पोसलीं जातात खरीं; पण प्राणी ह्मणून जेवढे, तींही जिऊबाईचीं मुलें; तीं झाडांवर व एकमेकांवरच निर्वाह करतात ! हजारों, लाखों वृक्ष जर नसते, शेतेंचीं शेतें जर न पिकतीं, तर प्राणी जगते कशावर ? इतर प्राण्यांवर ज्या प्राण्यांचा निर्वाह चालतो, अशाही प्राण्यांचा विचार करा. किडे, मुंग्या, गोगलगाई, काडू हे प्राणी जगांत नसते,

तर असंख्य पक्ष्यांचा निर्वाह चालता कसा? इतर प्राणी जर मुबलक नसते, तर सिंह, वाघ, लांडगे यांचें उपजीवन होतें कशावर? बरें, सिंह, व्याघ्रादि प्राणी मरून पडून सडले नसते, तर त्या गोगलगाई, किडे वगैरे असंख्य प्राण्यांचें तरी जीवन चालतें कशावर? या सर्वांचा विचार केला, ह्मणजे जिऊबाईची प्रजा असंख्य उत्पन्न होते कां आणि मरते कां याचें एक कारण चांगलें समजेल.

पण एवढ्यानेंच संपत नाहीं. याच्याहीपेक्षां खोल अशीं कारणें आहेत. समजा कीं, एखाद्या मोठ्या थोरल्या शाळेंत पुष्कळ मुलें आहेत, त्यांत दर सहा महिन्यांनीं आपलें प्रत्येक मुलास बक्षीस द्यावयाचा प्रघात असला,—मग तीं अभ्यास करोत अगर न करोत—तर मुलें कधीं मेहनती व अभ्यासी अशीं निघतील का? जर प्रत्येक माणसाला, मुळींच काम न करतां जें पाहिजे तें मिळत गेलें, मुलांलेंकरांनीं कांहीं न शिकतां न सवरतां त्यांना सुखांत ठेवण्याची तजवीज करतां आली, जीं जीं सुखें हवींशीं वाटतील, तीं तीं आपलीं आयतीं मिळालीं, तर कोणी निरनिराळे धंदे शिकण्याची, निरनिराळीं कष्टसाध्य कामें करण्याची कधीं तरी खटपट करील काय? दुसऱ्याच्यापेक्षां "बरी" अशी स्थितीच जर जगांत नसली, आपण श्रम केल्यास आपण दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ होऊं, अशी आशाच उरली नाहीं किंवा आशा करण्याची जरूर राहिली नाहीं तर कोण रिकाम्या त्रासांत पडणार आहे बरें? रात्रंदिवस जिवापाड श्रम करून

नवीन नवीन युक्त्या काढणें, नवीन प्रदेश शोधून काढून तेथें वस्ती करणें, वगैरे गोष्टींकडे मग मन घालतो कोण? स्वार्थ साधल्याखेरीज कोणाचेंच कोणत्या गोष्टींत अगर खटपटींत मन लागत नाहीं; मग तो स्वार्थ पैशाच्या लाभाबद्दल असो, अगर कीर्तीच्या लाभाबद्दल असो. असें नसतें, तर कोणी ज्ञानलाभाचा अगर दुसरा कोणताही उद्योग केला नसता.

या आयुष्यांत आत्मसंरक्षण सोपें नाहीं; त्याला अनेक खटाटोपी, अनेक मारामाऱ्या कराव्या लागतात ह्मणूनच सर्व व्यवहार चालले आहेत. लोक निरनिराळ्या युक्त्या काढतात, खटपटी करितात त्यामुळेंच आपली व आपल्या सभोंतालच्या सर्व वस्तूंची सुधारणा करितात. हीच स्थिति वृक्षादिकांची व प्राण्यांची आहे. जिऊबाई (जीवकोटि) सारखी शहाणी आई कोठेंच नाहीं. ती आपल्या मुलांचें शिक्षण किती उत्तम तऱ्हेनें चालविते? या जीवनाच्या लढाईंत जीं मुलें उत्तम प्रकारें लढतील, अत्यंत व्यवस्थित रहातील, एकंदरींत आपल्या हातून जितकें काम होईल तितकें उत्कृष्ट तऱ्हेनें करतील, त्यांसच ती बक्षिसें देते. सगळ्यांत उत्तम तऱ्हेनें राहील, त्यास व त्याच्या प्रजेस ती काय बक्षिसें देते पहा.—आरोग्य, शक्ति, सौख्य.

अहो, या पृथ्वीवर जन्माला आलेल्या प्रत्येक रोपड्याला व किड्याला आपलें अन्न मिळवावें लागतें, आपली उपजीविका चालवावी लागते व शत्रूंच्या प्रहारांपासून आपलें

संरक्षण करावें लागतें. कांहीं एक खटपट न करितां जर भक्ष्य मिळालें, तर कोळी आपलीं जाळीं एवढ्या सायासानें पसरून त्रास करीत बसेल कशाला ?

क्याडिस नांवाचा किडा वाळूची लांबलचक आणि कठीण अशी नळी करून आपलें मृदु असें शरीर सुरक्षित ठेवण्यास झटेल कशाला ? जर मृत्यु नसता तर—मृत्यूचें भय नसतें तर—कालवें समुद्रांतून चुना काढून कठिण कठिण अशा शिंपा करतींना, पक्षी घरटीं बांधतेना, जनावरें गुहा शोधतींना आणि माणसांनीं घरेंदारें, कोटकिल्ले बांधण्याची कधींच परवा केली नसती.

जिऊबाईचीं अगदीं लहान लेकरें.

मोठाले प्राणी व जीवजंतु आपल्यास दिसतात व त्यांचें निरीक्षण करतां येतें, परंतु "लहानसान जीव-जन्तु" असतात कसे ? हें आतां पाहूं. (Nati Luoae) रात्रि-प्रकाशी नांवाचे अत्यंत सूक्ष्म कीटक समुद्राच्या पाण्यांत आढळतात. यांस अवयव वगैरे कांहीं नसतात. एखादा गोंदाचा थेंब पाण्यावर पडला व त्याला बारीक बारीक फांटे फुटले, तर तो जसा दिसतो त्याप्रमाणें हा अत्यंत सूक्ष्म प्राणी मोठ्या शक्तीच्या सूक्ष्मदर्शक यंत्रांतून आपणांस दिसतो.

त्याला तोंड नाहीं, किंवा दुसरे कोणतेही अवयव नाहींत. तर मग तो प्राणी आहे. त्याला जीव आहे हें जाणावयाचें तरी कसें ? असा प्रश्न मनांत सहजच येतो, तर आतां त्याचें उत्तर आपण पाहूं या.

त्याला प्राणी हें नांव देण्याला पहिलें प्रमाण हें कीं, इतर प्राण्यांप्रमाणें तो श्वासोच्छ्वास करितो. त्याला जर चांगल्या पाण्यांत टाकलें, तर श्वासोच्छ्वास करून तो त्या पाण्यांतला प्राणवायु (Oxygen) घेऊन त्याच्या जागीं क्यारबॉनिक असिड ग्यास टाकतो, व त्या योगानें तें पाणी वाईट करून सोकतो. त्याला चलनवलन करण्याची शक्ति आहे. त्याच्या अंगाला जे फांटे असतात, ते त्याला मनास वाटेल तेव्हां, आकुंचित करतां येतात, व पसरतांही येतात. त्याचप्रमाणें पाण्यांत उगवणाऱ्या बारीक बारीक शेवाळाबिवाळावर तो आपली उपजिवीका करतो; इतकेंच नव्हे, तर त्याच्यापेक्षां मोठ्या मोठ्या अशा प्राण्यांवर देखील तो उपजीविका करितो. तो प्राणीच आहे, असें मानण्यास आणखी मोठें थोरलें कारण हें कीं, त्याची अंग-वृद्धि होत असते. आणि अशी वृद्धि होतां होतां नियमित अवस्थेला तो आला ह्मणजे एकाचीं दोन छकलें होऊन तीं दोनही छकलें पूर्वींच्या प्राण्याप्रमाणें दोन नवीन प्राणीच होतात !

जर्मनी देशांतले प्रोफेसर हेकेल यांनीं या प्राण्यांपैकीं एक, एका खिशांतल्या घड्याळाच्या कांचेच्या तबकडीवर किंचित् पाणी घालून तींत टेवून ती तबकडी सूक्ष्मदर्शक यंत्राच्या खालीं ठेविली; आणि त्या प्राण्याच्या एकंदर चलनवलनांचें एक सारखें निरीक्षण केलें. प्रथमतः जेव्हां त्यांनीं त्या प्राण्याकडे पाहिलें तेव्हां तो उगीच बारीक

बिंदूसारखा दिसत होता; आणि त्याच्याच जवळ एक सेरेटिअम नांवाचा, दुसरा प्राणी होता. हा प्राणी अत्यंत सूक्ष्म अशा परंतु काठिण अशा शिंपेंत राहणारा होता. थोड्या वेळानें पुनः पहातां, असें दिसलें कीं, तो पहिला प्राणी बिंदुवत् होता, तो आतां तसा न राहतां त्याला सभोंवार असंख्य फांटे फुटले आहेत. आणखी थोडासा अवकाश गेल्यावर पहातां असें दिसलें कीं, त्या प्राण्याचे ते सभोंवारचे तंतु त्या सेरेटिअम प्राण्याच्या शिंपेशीं येऊन चिकटले आहेत. यावरून अर्थातच असें दिसलें कीं, सेरेटिअम प्राणी आपल्या तंतुप्राण्याचा [रात्रिप्रकाशी प्राण्याचा] भक्ष्य होय. तो जवळ आला आहे असें याला कळतांच यानें आपले तंतु प्रसृत केले; आणि क्षणोक्षणीं असें दिसूं लागलें कीं, हा तंतुप्राणी त्या सेरेटिअम प्राण्याच्या जवळ जवळ जात आहे. दुसरें असें कीं, ज्या बाजूला हें भक्ष्य होतें, त्या बाजूचे तंतु मात्र विशेष प्रसृत होते; दुसऱ्या बाजूचे आकुंचितच राहिले. त्यानंतर सहा तास गेल्यावर प्रोफेसर हेकेल पुनः पहातात तों तो तंतुप्राणी स्पष्ट कोठेंही दिसेना; परंतु विशेष सूक्ष्म रीतीनें पहातां त्यांस असें दिसलें कीं, तो प्राणी त्या सेरेटिअम प्राण्याच्या शिंपेवर पातळ पापुद्र्याप्रमाणें पसरला आहे. तंतूंचें प्रसरण करतां करतां, त्यानें आपलें सर्वच शरीर त्या शिंपेवर नेऊन तिला गुरफटून टाकलें. दुसरे दिवशीं सकाळीं पुनः जों प्रोफेसर साहेब पहातात, तों आमचे हे

सूक्ष्म तंतुप्राणी जशाचे तसे आपल्या जागीं ! आणि त्यांच्या शेजारीं ती सेराटिअम प्राण्याची शिंप अगदींच रिकामी !

तेव्हां या अत्यंत सूक्ष्म प्राण्याला, नाहींत डोळे; नाहींत कान; नाहींत दुसरे कांहीं अवयव; पण त्याचें भक्ष्य जवळ आलें कीं, त्याला चटकन् समजतें ! स्नायु नसतां त्याला आपल्या भक्ष्याजवळ जातां येतें; तोंड नसतां शिंपेंतून आपल्या भक्ष्याचें शोषण करतां येतें; कोठा नसतां खाल्लेल्या भक्ष्याचें पचन करतां येतें; इतकेंच नव्हे, तर जें पचत नाहीं, किंवा कठिण तें त्यास फेंकून देतां येतें.

अतिशय लहान जीवजंतु !

एक जंतु ज्याला ‘ टरेटोमास पुटामी ’ असें इंग्रजींत ह्मणतात, त्याची लांबी १/८ इंच असते. दुसरे एक प्रकारचे कोळी आहेत, त्यांचा आकार वाळूच्या एका कणा एवढा असतो; व त्यांनीं काढलेले तंतु इतके बारीक असतात कीं, एक केंस होण्यास ते चार हजार एके ठिकाणीं घालावे लागतात. डाक्टर डालिंजर नांवाच्या प्राणिशास्त्रवेत्त्यानें ब्रिस्टल येथें एकदां व्याख्यान दिलें. त्यावेळीं असें सांगितलें कीं, एक दशसहस्रांश घनइंच जागेंत २८० कोटि प्राणी मावतील असे बारीक प्राणी आहेत. ह्मणजे हे प्राणी केवढे असतात याची कल्पना करणेंही अशक्य आहे. यावरून आमच्या जिऊबाईचा संसार किती बारीक अनंत व अमर्याद आहे हें जाणावें.

प्राचीन आर्यावर्तांतील दोन विद्यासंपन्न स्त्रिया.

१. खना.

भारतवर्षांतील प्राचीनकाळच्या विद्यासंपन्न स्त्रियांत खनाचें नांव प्रमुखांत गणलें जातें. वंग देशांत लहानापासून मोठ्या-पर्यंत,—मग तो शेतकरी असो अगर व्यापारी असो, ज्योतिषी असो अगर वेदांती असो,—तिचे दोहरे प्रत्येकास प्रिय असून त्यांतील उपदेशामृताचें सर्व लोक सेवन करि-तात. महाराष्ट्रांत जसे तुकारामाचे अभंग, तसे बंगाल्यांत खनाचे दोहरे होत. अशा गुणवती व यशस्विनी स्त्रीचा विश्वसनीय चरित्रवृत्तांत मिळत नाहीं. जो वृत्तांत मिळतो तो खालीं लिहिल्याप्रमाणें आहेः—

खना ही विक्रमादित्याच्या वेळीं उदयास आली. ह्मणजे तिला होऊन आज जवळ जवळ दोन हजार वर्षें होत आलीं. उत्तर प्रदेशांत अशी दंतकथा प्रचलित आहे कीं, ती कोण्या एका राजाची कन्या असून कित्येक राक्षसांनीं तिच्या कुटुंबांतील सर्व माणसांस भक्षण करून, बाल्यावस्थेंतच तिला सिंहलद्वीपांत नेलें आणि पुढें तिजविषयीं त्या राक्षसांच्या राजाच्या मनांत प्रेम उप-जून त्यानें कन्येप्रमाणें तिचें लालनपालन केलें. राक्षस ज्योतिषशास्त्रांत निपुण होते. जो राक्षस खनेचें प्रति-

पालन करीत असे तो सर्वांपेक्षां ज्योतिषशास्त्रांत विशेष प्रवीण होता. आपल्या शिष्याबरोबर खनेसही ज्योतिष शिकविण्यास त्यानें आरंभ केला. तिला दुसरा कोणताही व्यवसाय नसल्यामुळें, तिचा सर्व वेळ ज्योतिषाच्या परिशीलनांत जात असे. यामुळें ती थोड्या अवकाशांत त्या शास्त्रांत फारच निपुण झाली.

राक्षसाच्या घरांत खनेचें प्रतिपालन होत असून, ती ज्योतिषाचें अध्ययन करीत असे, तेव्हांच दैवयोगानें त्याच प्रदेशांत आणखी एक मनुष्याचे बाळक तेथें रहात असे. या मुलाचें नांव मिहिर असून, विक्रमादित्याच्या नवरत्नांत वराह ह्मणून जो महापंडित होता, त्याचा हा पुत्र होय. वराह ज्योतिषांत फार प्रख्यात होता. त्यास पुत्र होतांच त्याचें त्याणें जातक करून पाहिलें, तेव्हां हा दहा वर्षांपेक्षां जास्त वर्षें जगणार नाहीं, अशी त्याची खात्री झाली. ह्मणून अल्पायुषी मुलावर प्रीति करून, मग दुःख करीत बसणें योग्य नव्हे, असा विचार करून उपजतांच त्या अर्भकास ताम्रपात्रांत घालून त्यानें नदींत सोडिलें. तें भांडें तरंगत तरंगत समुद्रांत गेलें. तेथें कित्येक राक्षसी स्नान करीत होत्या; त्यांनीं मोठ्या परिश्रमानें तें भांडें धरून, त्यांतील बाळकास घरीं आणून त्याचें पुत्राप्रमाणें पालन केलें. हा खनेस योग्य वर आहे असें पाहून तिच्याशीं त्याचें त्यांनीं लग्न केलें. खना आणि मिहिर पुष्कळ वर्षें लंकेंत राहून, राक्षसांच्या आचार व्यवहारांस कंटाळल्यामुळें, तेथून पलायनाचा योग पहात असत. राक्षसांना त्यांच्या बेताचा संशय आल्यामुळें, व त्यांनीं जाऊं नये, असें त्यांस वाटत असल्यामुळें त्यांजवर त्यांनीं

कडक पहारा बसविला. एके दिवशीं राक्षस जेवणास बसले होते, त्यावेळीं खना व मिहिर तेथून निघाली. जेवावयास बसले असतां कशाही कारणानें उठूं नये असा राक्षसांचा नियम असल्यामुळें, ह्या सुयोगावर निघालेल्या मनुष्यांस प्रतिबंध करवतां येत नाहीं, असें पाहून त्यांनीं त्यांस सुखानें निरोप दिला. त्यांजवर प्रेम करणाऱ्या एका राक्षसीनें, भूगोल, खगोल व पाताळ त्यांच्या तत्त्वाच्या ज्ञानानें भरलेल्या कित्येक पोथ्या एका परिचारकाकडून त्यांस देववून समुद्रापर्यंत त्यांना पोंचविण्यास सांगितलें. व त्यांची परीक्षा घेऊन जर त्यांच्या ठिकाणीं ज्योतिषाचें अपूर्णत्व दिसलें, तर पोथ्या देऊन परत येण्यास सांगितलें. त्यावेळीं समुद्राच्या तीरावर एक गाय प्रसूत होत होती, तिला पाहून राक्षसीनें मिहिरास विचारिलें, या गाईस वासरूं कोणत्या रंगाचें होईल. मिहिरानें गणित करून सफेत रंगाचें ह्मणून सांगितलें, व वासरूं काळ्या रंगाचें झालें. तें पाहून राक्षसीनें विचार केला कीं, यांस अद्याप पूर्ण ज्ञान झालें नाहीं? ह्मणून पोथ्या मिहिराकडेस देऊन ती निघून गेली. मिहिरानें आपलें गणित खोटें ठरलें, तेव्हां या ज्योतिषांत कांहीं अर्थ नाहीं, ह्मणून पोथीचीं पानें फाडण्यास आरंभ केला. कित्येक पानें फाडल्यावर खना प्रतिबंध करून ह्मणाली, गणित खोटें व्हावयाचें नाहीं. गाईनें वासरूं चाटल्यामुळें तें बघा सफेत झालें, तेव्हां पहातो तो पाताळतत्त्वाचीं पानें फाटून गेलीं. भूगोल आणि खगोल हे मात्र दोन ग्रंथ राहिले, त्याचाच आर्यावर्तांत सर्वत्र प्रसार झाला.

खना आणि मिहिर समुद्रांतून प्रवास करीत करीत

एका जंगलांत आली. त्याच वनांत विक्रमादित्य राजा मृगया करीत हिंडत होता; तेथें यांची भेट झाली. मिहिरानें ज्योतिषशास्त्रपारंगत असल्याचें सांगतांच राजा त्यांस राजधानींत घेऊन गेला. तेथें वराहाची व त्याची भेट झाली. वराह प्रथम मिहिराचा मनांतून हेवा करीत असे. एके दिवशीं दोघांच्या सहज कांहीं गोष्टी चालल्या होत्या. तेव्हां मिहिरानें वराहास विचारिलें कीं, तुह्मांस मुलें किती आहेत? तेव्हां तो ह्मणाला, मला एक मुलगा झाला होता; पण अल्पायुषी जाणून मी त्यास पाण्यांत सोडिला. मिहिर ह्मणाला, त्यास शंभर वर्षें आयुष्य असून अद्याप तो जिवंत आहे. वराहानें गणित करून पाहतां, शंभराच्या जागीं दहा पडून झालेली चूक त्याच्या ध्यानीं आली. बोलतां बोलतां मिहिर हा आपलाच मुलगा, अशी त्याची पक्की खात्री झाली. तेव्हां तो सुनेसह पुत्रांस घरीं घेऊन आला.

खनेस श्वशुरगृहीं प्रवेश झाल्यामुळें फार आनंद झाला. ती जशी विद्यासंपन्न होती, तशीच सुशील असून, गृहांतील कामांत निपुण होती. परंतु अग्नि वस्त्रांत जसा अवगुंठित होत नाहीं, तशीच तिची स्थिति झाली. तिच्या सासऱ्याकडेस पुष्कळ लोक प्रश्न विचारण्यासाठीं येत असत; तेव्हां इकडे दुसरीं कामें करीत असतां, व तिकडे श्वशुर पाटीवर आंकडे मांडित असतां इनें उत्तर सांगावें. हें पाहून येणाऱ्या लोकांस व वराहास फार आश्चर्य वाटत असे. हळू हळू ही गोष्ट चोहोंदेशीं फैलावून तिची फारच कीर्ति झाली. एके दिवशीं खनेनें स्वयंपाक तयार केला, पण मामंजी लवकर आले नाहींत; याचें कारण काय

असावें तें जाणण्यासाठीं तिनें गणित करून पहातां, तिला समजलें कीं, ते कांहीं विचारांत मग्न आहेत; हें पाहून तिनें मामंजीकडे येऊन विनयपूर्वक चिंतेचें कारण विचारिलें. वराह ह्मणाला, मुली, राजसभेंत असा एक प्रश्न निघाला आहे कीं, आकाशांत किती तारे आहेत? कोणाकडूनही ह्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं. आणि सर्वांत मी तर प्रख्यात ज्योतिषी आहें, तेव्हां जर ह प्रश्नाचा निर्णय मजकडून झाला नाहीं, तर माझा अपमान होणार. खना गंभीरतेनें ह्मणाली, "याचाच विचार करीत आहां काय? आपण भोजन करा, मग उत्तर देतां येईल. वराह ह्मणाला, मी अशी प्रतिज्ञा केली आहे कीं, जोंपर्यंत याचा निर्णय होणार नाहीं तोंपर्यंत पाणी सुद्धां पिणार नाहीं. खनेनें तेव्हांच कित्येक आंकडे मांडून आकाशांतील ताऱ्यांची संख्या सांगितली. वराह भोजन करून आनंदानें राजसभेंत गेला. गणित दाखवून त्यानें अंतरिक्षांतील ताऱ्यांच्या संख्येबद्दल सर्वांची खात्री केली. या प्रश्नाचा उलगडा प्रथम कोणीं केला, असें राजानें विचारितां, वराहानें आपल्या स्नुषेचें नांव सांगितलें. तें ऐकून राजा आनंद प्रदर्शित करून ह्मणाला, "तिला आतांच इकडे घेऊन या, माझ्या सभेंतील नऊ रत्नांचें प्रमुखत्व आज मी तिला देणार आहे." हें राजसन्मानपद खनेच्या नाशास कारणभूत झालें. वराहास आपल्या स्नुषेनें राजसभेंत प्रधान होणें शिष्ट संप्रदायाविरुद्ध वाटूं लागलें. यामुळें आपल्या स्नुषेच्या नीतीस व कुलीनतेस हीनत्व येईल, ह्मणून त्यानें मिहिरास भार्येची जीभ कापून टाकण्यास सांगितलें. खनेनें जीभ

कापतांच प्राण जाणार असें पूर्वीच गणित वर्तविलें होतें. ह्मणून प्रियपती येतांच त्यास आलिंगन देऊन, जीभ कापून पित्राज्ञेचें पालन करण्याविषयीं विनंति केली. मिहिरानें पितृवचनास्तव दुःखद अंतःकरणानें प्रियपत्नीची जीभ कापिली. तत्काळ खनेच्या नश्वर शरीरांतून आत्मा निघून गेला. आणि खना हें नांव आर्यावर्तांत चिरस्थायी झालें.

२. आवियार.

मद्रास इलाख्यांत नवव्या शतकांत सात विभूतींचा जन्म झाला होता; त्यांत तीन पुरुष असून बाकी चार स्त्रिया होत्या. त्यांत आवियार ही त्या देशांत फार प्रसिद्ध आहे. पण आर्यावर्तांत प्राक्कालीन लोकांत चरित्रें लिहून ठेवण्याचा तादृश प्रघात नसल्यामुळें, परंपरेच्या दंतकथां-शिवाय चरित्रास कांहींच आधार नसतो. इच्याविषयीं दोन दंतकथा त्या प्रांतीं प्रचलित आहेत.

आवियारचें वसतिस्थान देवलोकांत असतां तिनें कांहीं पापाचरण केल्यामुळें, तेथून ती भ्रष्ट होऊन मानवी देहानें मृत्युलोकांत आली. तपश्चर्या करून पापाचें क्षालन होई-पर्यंत तिचा उद्धार होणार नव्हता.

दुसरी अशी एक दंतकथा चालत आली आहे कीं, दमलवय नांवाचा एक ब्राह्मण होता. त्या ब्राह्मणाच्या घरा-समोरच्या गल्लींत कित्येक जातिभ्रष्ट व हलक्या वर्णाचे लोक रहात असत. एके दिवशीं रात्रीच्या वेळीं त्यांतील एकाच्या घरावर एक नक्षत्र पडत होतें, तें दमलवयानें पाहून गणित करितां, या घरांत जी आतां कन्या जन्मणार तिचा विवाह आपल्या मुलाशीं होणार हें पाहून त्यास फार वाईट

वाटलें. दमलवयानें आपला हेतु गुप्त ठेवून परोपकाराचें कातडें पांघरून, दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं तो त्या ज्ञातिभ्रष्ट ब्राह्मणाच्या घरीं गेला व त्यास ह्मणतो, या गृहीं जी काल रात्रीं कन्या जन्मली आहे, तिचा जन्मस्थ ग्रह अनिष्ट असल्यामुळें तिचा त्याग न केल्यास पित्यास अपकार होईल. स्वतःस अपकार होईल हें पित्याच्या कानीं पडतांच त्या अनाथ बालकाचा प्राण घेण्यास तो उद्युक्त झाला. पण तें दमलवयास बरें वाटलें नाहीं. तेव्हां दमलवयाच्या सल्ल्यानें त्या अर्भकास पेटींत घालून ती पेटी कावेरीच्या पुण्य उदकांत टाकिली. अर्भकास पेटींत घालण्यापूर्वीं दमलवयानें त्या मुलीच्या शरीरावर कांहीं खुणा असल्यास पहाण्यासाठीं आपला मुलगा जो पूरुवल त्यास पाठविलें होतें. पूरुवलानें मुलीस पाहून तिच्या जांघेवर तीळ असल्याचें पित्यास सांगितलें.

थोड्या दिवसांनंतर दमलवय मरण पावला. त्या कन्येच्या जीवनाचा शेवट झाला, असें सर्वांस वाटत होतें. पण जगच्चालक परमेश्वरानें तिचें रक्षण केल्यामुळें तिच्या जीवनचरित्रास आरंभ होत होता. ती नदी वहात वहात विस्तीर्ण होत गेली होती; तिच्या कांठच्या एका प्रदेशांत एका ब्राह्मणास ती पेटी मिळाली. तो उघडून पहातो तर त्यांत निद्रिस्त मुलगी आहे; हें पाहून त्या ब्राह्मणास आश्चर्य वाटलें, व त्यास कांहीं संतान नसल्यामुळें तिचें त्यानें मुलीप्रमाणें लालनपालन केलें.

पित्याच्या निधनानंतर पूरुवलाची सांपत्तिक स्थिति फार वाईट झाली. ह्मणून पित्याप्रमाणें विदेशांत जाऊन धन-

संचय करण्यासाठीं तो निघाला. प्रवास करीत करीत ज्या ब्राह्मणानें त्या कन्येचें पालन केलें होतें, त्याच्या घरीं तो उतरला. ब्राह्मणानें पूरुब्रलाची विद्वत्ता पाहून कांहीं दिवस रहाण्याचा आग्रह करून त्यास ठेवून घेतलें. कन्येची च पूरुब्रलाची अन्योन्यप्रीति जडून दोघांचा लवकरच विवाह झाला. पण त्या कन्येच्या दुर्दैवानें तो तीळ पूरुब्रलाच्या दृष्टीस पडतांच त्यास फार दुःख झालें. ह्मणून कोणास न कळवितां तो तेथून निघून गेला. कन्येची पूर्वपीठिका समजल्यामुळें जांवई निघून गेला, असें ब्राह्मणास समजतांच तो तिचा तिरस्कार करूं लागला. पतीची आपण कोण-तीही अवज्ञा न करितां त्यानें विनाकारण आपला त्याग केला, ह्मणून त्याच्या शोधार्थ कोणास न कळत तीही निघाली. देशविदेशांत फिरत असतां एका लहानशा खेड्यांत तिला त्याचा पत्ता लागला. पतीचे पाय धरून ती त्यास ह्मणाली: ‘दासीचा त्याग करूं नका. जर मी दोषी असेन तर क्षमा करून माझा स्वीकार करा.” पांच दिवस दोन्ही एकत्र होतीं; पण त्या निर्दय पूरुब्रलानें पत्नी निद्रिस्त असतां पुनः तिचा त्याग केला. असें असून ती पुनः त्याच्या शोधार्थ निघाली.

ती संन्यासिनीच्या वेषांत फिरत असतां, एका धनवान् ब्राह्मणानें तिचें स्पृहणीय वर्तन पाहून, तिला आपल्या घरीं ठेवून घेतलें. ती त्या ब्राह्मणाच्या मुलीबरोबर मोठ्या ममतेनें वागत असे. ब्राह्मणास मुलगा नसल्यामुळें मरतेवेळीं त्यानें आपली सर्व संपत्ति मुलीस विभागून दिली. त्यांतील कांहीं भाग ह्या पाळित मुलीसही दिला. त्या साध्वी कन्येनें तें

मुबलक धन मिळतांच, सत्कार्यांत व्यय करण्यास आरंभ केला. कोणीही अनाथ आल्यास त्याचा सत्कार इच्याकडून होत असे.

कांहीं दिवस गेल्यावर पूरुबळ तिच्या आश्रमांत आला. तिनें त्याचें आदरातिथ्य करून फारच गौरव केला. तो त्याच रात्रीं तिचा त्याग करून जात असतां, त्याचे चरण धरून पत्नी रुदन करूं लागली. तेव्हां पूरुबळास दया येऊन त्यानें तिचा स्वीकार केला. उभयतांही प्रवासास निघालीं. तीर्थयात्रा करीत असतां सात मुलें झालीं. पूरुबळानें भार्येस तीं सर्व मुलें एका रखरखीत मैदानांत टाकून येण्यास सांगितलें. मातेचें हृदय! पण पतीच्या आज्ञेचें उल्लंघन तिच्यानें करवेना. पत्नीनें मुलांचा त्याग केल्यावर उभयतांनीं प्रवासास आरंभ केला. इकडे तीं मुलें निरनिराळ्या लोकांस मिळून, तीं पुढें पंडित, महामहोपाध्याय अशा योग्यतेचीं झालीं. त्यांतील जी एक मुलगी एका कवीस मिळाली तीच ही आवियार होय.

आवियार ज्योतिष, चिकित्सा, भूविद्या इत्यादि शास्त्रांत फार प्रवीण होती. तिणें या विषयावर स्वभाषेंत पुष्कळ निबंध लिहिले आहेत. आवियार तहाहयात कुमारी असून, आपल्या पवित्र आचरणानें व विद्वत्तेनें सर्वांच्या भक्तीस व श्रद्धेस पात्र झाली होती. आवियारचे धर्मविषयक निबंध तामिळ विद्यालयांत मोठ्या प्रीतीनें वाचितात. तिनें लिहिलेले ग्रंथ नीतीनें भरलेले आहेत. त्यांत "कनविनिदान" आणि "नैतिक वाक्यावली" हे दोन ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. आवियार त्या देशांत कवयित्री आणि नीतिज्ञ ह्मणून फार प्रख्यात आहे.

मी आहें केवढा !

हा प्रश्न मोठा चमत्कारिक आहे, नाहीं बरें? या संसारांत जेव्हां मोठमोठाल्या गोष्टी आपण सांगतों तेव्हां आपल्याला किती बरें अभिमान वाटतो! आपली उंची मावण्यास सारें जग ठेंगणें वाटतें, नव्हे? त्या वेळीं आपण खरोखर आहोंत केवढे याचा आपण कधीं विचार करतों काय? आपण श्रीमंतीचा अभिमान सांगतों, तेव्हां आपणाजवळ आहे काय तें ध्यानांत घेण्यापेक्षां आपल्याजवळ नाहीं काय, याचा विचार करूं लागलों, तर आपला अभिमान क्षणभर तरी टिकेल काय? ज्ञानाची घमेंड मारतांना आपल्याला येतें काय, याच्यापेक्षां येत नाहीं काय याचा विचार मनांत आणल्यास घमेंडीला तिळभर तरी जागा राहील काय? सत्तेची शेखी मिरवितांना आपल्या स्वाधीन आहे काय, याचा विचार न करतां आपल्या स्वाधीन नाहीं काय, याचा विचार करूं लागलों तर त्या शेखीची काय अवस्था होईल?

एके दिवशीं संध्याकाळीं मी आपल्या स्नेह्यांबरोबर नानाप्रकारच्या गोष्टी सांगत माझ्या घरीं गच्चीवर बसलों हातों. गोष्टी बोलतां बोलतां अर्थातच त्यांत कांहीं "मीं असें केलें; मी असें बोललों; मी असें लिहिलें; आह्मी कसले वस्ताद! मी काय त्याला फसतों!" अशीं नानातऱ्हेचीं अभिमानदर्शक बोलणीं आमच्या सर्वांच्या

बोलण्यांत आलीं. कोणाची निंदा, कोणाची थट्टा, कोणाची टवाळी असें चाललें होतें. होतां होतां सूर्यास्त झाला; सर्व स्नेहीमंडळी एकामागून एक आपापल्या घरीं निघून गेली, आणि मी एकटाच तेथें गच्चीवर बसलेला राहिलों. सूर्यप्रकाश अगदीं नाहींसा झाला. रात्र अंधारी असल्यामुळें जिकडे तिकडे काळोख पसरून आकाशांत मात्र, जगूं काय आह्मां मनुष्यांचें अनुकरणच करणाऱ्या तारका आपापला आत्मप्रकाश पुढें करून चमकूं लागल्या. माझ्या मनांत मात्र त्या वेळीं अहंता अगदीं नाहींशी होऊन फारच चमत्कारिक विचार आले. माझ्या डोक्यावरच आकाशगंगेचा भाग दिसत होता, त्याकडे माझी दृष्टि जाऊन मीं आपल्याशींच ह्मटलें: "अरेरे! काय हा आमचा वृथा अभिमान! मी ह्मणजे या अनंत विश्वाचा कितवा अंश बरें? या अनंत आकाशांत अनंत तारे असून एवढे सगळे सूर्य आहेत असें आपलें ज्योतिःशास्त्राचें अल्प ज्ञान आपणास सांगतें, व तें आपण खरें मानतों. आपल्या पृथ्वीस प्रकाश, जीवन वगैरे देणारा हा सूर्य या अनंत सूर्यांपैकीं एक! आमची पृथ्वी जी आह्मांस एवढी प्रचंड वाटते ती या सूर्याभोंवती प्रदक्षणा घालीत असणाऱ्या अनंत ग्रहोपग्रहांपैकीं एक! त्या या आमच्या पृथ्वीवर सचेतन अचेतन पदार्थ अनंत! त्यांत सचेतनही अनंत! त्यांच्या जाति अनंत! त्यांत मनुष्यजातीचे प्राणी अनंत आणि अस्मादिक त्यांपैकीं एक! असें असतांना आपणास

एवढा अभिमान कशाचा बरें वाटतो? "कीटश्च कोटायते" अशी आपली विश्वाशीं तुलना करतां स्थिति! ती आपणांस स्पष्ट दिसते; मनांत आणली तर अगदीं खरी वाटते; विचार केला तर अहंता गळूनही जाते; पण ती किती वेळ? क्षणमात्रच! एकदां ते विचार निघून गेले, ह्मणजे पुनः मी आपला अरेरावचा अरेरावच!" असे विलक्षण विचार माझ्या मनांत येऊन मी फार उदास झालों! त्या जागेवरून उठूं नये, आकाशांतील ताऱ्यांवरून दृष्टि काढूं नये असें वाटूं लागलें व मी आहें केवढा? हा अहंतानाशक प्रश्न पुनः पुनः मनांत येऊन मी अगदीं गोंधळून गेलों.

